https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १७५ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि. ६ ऑगस्ट २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## देशभरातील विमानतळांवर हाय अलर्ट जाहीर

### बीसीएएसकडून सुरक्षा वाढवण्याच्या सूचना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६नवी दिल्ली**

दहशतवादी हल्ल्याच्या संभाव्य धोक्याच्या पार्श्वभूमीवर देशभरातील विमानतळांवर हाय अलर्ट जाहीर करण्यात आला. नागरी विमान वाहतूक सुरक्षा ब्युरोकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे, दहशतवादी किंवा समाजविरोधी घटकांकडून धोका असल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली. तसेच सर्व विमानतळांवरील सुरक्षा अधिक कडक करण्यात आली असून प्रत्येक हालचालीवर सुरक्षा यंत्रणा बारकाईने लक्ष ठेवून आहे.



यासंदर्भात नागरी विमान वाहतूक सुरक्षा ब्युरोने सूचना जारी केल्या आहेत. त्यात असे म्हटले आहे की, केंद्रीय सुरक्षा यंत्रणांकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे, सर्व यंत्रणांना देशातील सर्व विमानतळ, धावपट्ट्या, एअरफील्ड, हवाई दल स्थानके आणि हेलिपॅड्सवरील सुरक्षा वाढवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. २२ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत दहशतवादी देशातील विमानतळांवर हल्ला करण्याची शक्यता आहे.

पाकिस्तानी दहशतवादी गटाच्या कारवायांशी संबंधित विशिष्ट माहितीवर आधारित आहे. ४ ऑगस्ट रोजी जारी केलेल्या या आदेशात, बीसीएएसने असेही म्हटले आहे की, स्थानिक पोलीस, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल, गुप्तचर विभाग आणि इतर संबंधित एजन्सींशी समन्वय राखला पाहिजे, असेही बीसीएएसने सूचित केले आहे. दरम्यान, विमानतळ टर्मिनल, पार्किंग आणि इतर संवेदनशील भागांत गस्त वाढवण्यात यावी. शिवाय, सर्व सीसीटीव्ही यंत्रणा नॉन-स्टॉप सक्रिय मोडमध्ये ठेवा. कोणतीही संशयास्पद वस्तू आढळल्यास त्वरित तपासणी करण्यात यावी, असेही आदेश देण्यात आले. याचबरोबर नागरिकांना सतर्क राहण्याचा इशारा देण्यात आला आहे.

## सरसंघचालक भागवत म्हणाले, छावा चित्रपट पाहिला का?, मुंडके छाटले तरी धर्म सोडला नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६नागपूर**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी रविवारी नागपुरात धर्म जागरण न्यासच्या प्रांतीय कार्यालयाच्या उद्घाटनप्रसंगी धर्माविषयी आपले विचार मांडले. धर्म हा केवळ देवपूजेपुरता मर्यादित नसून, तो समाजाला एकत्र ठेवणारी आणि एकात्मतेला बळ देणारी शक्ती आहे. धर्मासाठी कित्येकांनी बलिदान दिले, शिरांचे ढीग लागले, पण धर्म सोडला नाही, असे ते म्हणाले.

मोहन भागवत यांनी आपल्या भाषणात म्हटले आहे की, धर्मकार्य हे केवळ देवासाठी नसून, समाजाच्या हितासाठी आहे. धर्म योग्य असेल, तर समाजही योग्य




दिशेने जाईल. समाजात शांतता नांदेल, संघर्ष निर्माण होणार नाही, आणि विषमता कमी होईल. खऱ्या अर्थाने धर्म समजून घेऊन समाजाने वाटचाल केली, तरच सकारात्मक बदल घडू शकतो. भारताचा इतिहास धर्मासाठी केलेल्या त्यागांनी भरलेला आहे, धर्मासाठी अनेकांनी बलिदान दिले, शिरांचे ढीग लागले पण धर्म सोडला नाही.

मोहन भागवत यांनी स्पष्टपणे सांगितले की, हिंदू धर्म म्हणजे केवळ एका समाजाचा धर्म नसून तो प्रत्यक्षात मानव धर्म आहे, जो प्रथम हिंदूंनी ओळखला आणि आपल्या आचरणात आणला. आज जगभरात संघर्ष, पर्यावरणीय संकटे आणि सामाजिक विघटन यांचा सामना केला जात आहे, कारण विविधतेला कसे स्वीकारावे आणि हाताळावे हे अनेकांना ठाऊक नाही. आपल्या धर्माने हे आधीच करून दाखवले आहे, आणि आता जगाने हे शिकणे गरजेचे आहे.

**भाषणात छावा चित्रपटाचा उल्लेख**

धर्म म्हणजे केवळ पूजा किंवा उपासना नसून, तो एक कर्तव्य आहे. मातृत्व धर्म, पितृत्व धर्म, पुत्र धर्म, मित्र धर्म, प्रजा धर्म आणि राजधर्म, हे सर्व धर्माचेच भाग आहेत. जो या धर्माचे पालन करतो, तोच खरा धार्मिक व्यक्ती आहे. आपल्या समाजातील सामान्य जनतेनेही धर्मासाठी मोठमोठे त्याग केले आहेत. छावा चित्रपटामध्ये दाखवलेले आदर्श हे आपल्या समाजाचेच प्रतिबिंब आहेत, असेही ते म्हणाले.

## शेतकऱ्यांसाठी १ दिवस मुंबई बंदचा आवाज उठवावा ‘शिवतीर्थ’वर बच्चू कडूंनी घेतली राज ठाकरेंची भेट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६ मुंबई**

मुंबई अनेकदा आम्ही बंद होताना पाहिली. ही मुंबई शेतकऱ्यांसाठी एक दिवस बंद राहिली पाहिजे. मुंबईने शेतकऱ्यांच्या पाठीशी उभं राहावे, ही देशाची आर्थिक राजधानी आहे. इथूनच शेतकऱ्यांना दिलासा देणारा आवाज उठावा या अपेक्षा आमच्या राज ठाकरेंकडून आहेत. शेतकरी हा विषय एका पक्षाचा नाही, एका जातीधर्माचा नाही. शेतकरी सर्व जातीधर्माचा आहे. त्यामुळे मनसे यात पुढे आली तर निश्चितच शेतकरी आंदोलनाला बळ मिळेल. आमचा अजेंडा निवडणुकीचा नाही. मरणारा शेतकरी वाचवायचा आहे असं प्रहारचे नेते बच्चू कडू यांनी सांगितले. कडू यांनी मुंबईतील शिवतीर्थ निवासस्थानी मनसे प्रमुख राज ठाकरेंची भेट घेतली.



या भेटीत दोन्ही नेत्यांनी शेतकरी प्रश्नावर चर्चा केली. या भेटीनंतर बच्चू कडू म्हणाले की, शेतकऱ्यांचा विषय हाच आमच्यात संवाद होता. शेतकरी मुद्द्यावर कसं आणि कधी पुढे गेले पाहिजे, आंदोलन काय केले पाहिजे या सर्वांवर एकंदरीत चर्चा झाली. शेतकरी अडचणीत सापडला आहे. सरकार शेतकऱ्यांची टिंगलबाजी करतंय हे फार चुकीचे आहे. दुष्काळ पडला तर कर्जमाफीचा विचार करू असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणतात. दुष्काळ पडायची वाट शेतकऱ्यांनी पाहावी असं चित्र सरकारकडून उभे केले जात आहे. ही शेतकऱ्यांसाठी दुर्दैवी गोष्ट आहे. दुष्काळापेक्षा जास्त नुकसान पिकाला भाव मिळत नाही म्हणून होत आहे. मागील २ वर्षापासून मालाचे दर घसरत आहेत. हे मुख्यमंत्री फडणवीसांच्या लक्षात आले पाहिजे. हा विषय महत्त्वाचा असल्याने मराठवाड्यात आमची शेतकऱ्यांसाठी यात्रा निघणार आहे. त्यासाठी राज ठाकरेंनी आंदोलनाला यावे, शेतकऱ्यांना संबोधित करावे असं त्यांनी बैठकीत सांगितल्याचं म्हटलं.

तसेच शेतकऱ्यांचे आंदोलन जात-धर्म, पक्ष विरहित असायला हवे. राजकारण शेतकऱ्यांच्या भल्यासाठी करायचे आहे. मेंढपाळ, मच्छिमार यांना न्याय मिळाला पाहिजे. शेतकरी विषयावर राज ठाकरेंचा अभ्यास दिसून आला. परंतु शेतकरी एकत्र येणार का अशी खंत आहे. शेतकरी एकत्र येत नाही आणि झाला तर राजकारणात होत नाही. शरद जोशींसारख्या माणसाला शेतकऱ्यांनी पाडले होते. हे दुर्दैवी होते. आम्ही लढतोय, राजू शेट्टी असतील ते शेतकऱ्यांसाठी लढा देत आहेत, ते राजकारणात मागेच राहिले आहेत. तरीही राजकारण बाजूला ठेवून शेतकरी लढा उभा राहावा हा आमचा प्रयत्न आहे. ९ तारखेला रक्षाबंधन आहे. आम्ही शेतकऱ्यांकडून सरकारला वेदनेची राखी बांधणार आहोत. आत्महत्या कुटुंबातील महिला राखी बांधतील. रोज १०-१५ शेतकरी आत्महत्या करतायेत. एखाद्या युद्धात जितके मृत पावत नाहीत तितके सरकारच्या धोरणामुळे मृत्यू होत असतील तर हा गंभीर विषय आहे असं बच्चू कडू यांनी सांगितले.

दरम्यान, आता निवडणूक आयोग म्हणतंय, ततझ-ढ देणार नाही मग निवडणुकीला अर्थ काय, त्यापेक्षा भाजपा कार्यालयातून ठपके मारा आणि निवडणूक करा. ईव्हीएम मशिन असेल तर तुम्ही निवडणुका कशाला लढता, हे भय सामान्य नागरिकांमध्ये, कार्यकर्त्यांमध्ये आहे. ही लोकभावना तयार होत आहे असा आरोप करत बच्चू कडू यांनी भाजपावर निशाणा साधला.

**३०-४५ मिनिटे झाली बैठक**

काही दिवसांपूर्वी अमरावतीत बच्चू कडू यांनी शेतकऱ्यांच्या मागणीसाठी पदयात्रा काढली होती. त्यात पदयात्रेत मी स्वत: आणि मनसेचे कार्यकर्ते सहभागी झाले होते. त्यानंतरच्या चक्का जाम आंदोलनालाही पाठिंबा दिला होता. बच्चू कडू हे लढाऊ बाण्याचा व्यक्ती आहे. त्यांनी राज ठाकरेंशी भेटून शेतकरी विषयावर चर्चा केली. शेतकऱ्यांना न्याय मिळत नाही त्या दृष्टीने आज दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा झाली. अर्धा पाऊण तास ही बैठक झाली. येणाऱ्या काळात मराठवाडा येथे शेतकरी आंदोलन उभे राहतंय. परभणीपासून पदयात्रा सुरू होतेय, त्याचं निमंत्रण राज ठाकरेंना दिली आहे. त्याला सकारात्मक प्रतिसाद दिला आहे अशी माहिती मनसे नेते बाळा नांदगावकर यांनी दिली.

## माजी आमदार हर्षवर्धन जाधव यांना एक वर्ष कारावास



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६नागपूर**

सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी कन्नडचे माजी आमदार हर्षवर्धन जाधव यांना नागपूर सत्र न्यायालयाने बुधवारी एक वर्ष कारावासाची शिक्षा सुनावली.

२०२४ मध्ये शिवसेना (ठाकरे गट) प्रमुख उद्धव ठाकरे हे नागपूरमध्ये असताना हर्षवर्धन जाधव त्यांना भेटण्यासाठी एका हॉटेलमध्ये गेले होते. त्यावेळी सुरक्षेच्या कारणास्तव पोलिसांनी त्यांना अडवले. यामुळे संतापलेल्या जाधव यांनी पोलिसांसोबत वाद घातला होता. या घटनेनंतर त्यांच्यावर सरकारी कामात अडथळा आणल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

## सणासुदीचा हंगाम सुरू, खाद्यतेल महागले! गृहिणींच्या बजेटला फटका

### सोयाबीन, पाम, मोहरी, राइस ब्रान,खोबरेल तेलाच्या दरात झपाट्याने वाढ : बजेटवर ताण वाढला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

सणांचा हंगाम सुरू होताच घरगुती बजेटवर महागाईचा नवा फटका बसला आहे. रक्षाबंधन, महालक्ष्मीपूजन आणि गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरात खाद्यतेलाची मागणी झपाट्याने वाढत असून, त्याचा थेट परिणाम दरवाढीवर झाला आहे. मागील काही दिवसांत सोयाबीन, पाम, मोहरी, राइस ब्रान तेलाच्या दरात प्रति किलो ४ ते १० रुपयांपर्यंत वाढ झाली आहे.

सणाच्या उंबरठ्यावर दरवर्षीच तेल दरवाढीचा फटका सामान्य नागरिकांना बसतो. रक्षाबंधन, महालक्ष्मी पूजन आणि गणेशोत्सव या महत्त्वाच्या सणांमुळे बाजारात खाद्यतेलाची मागणी तीव्र झाली आहे.मिठाई, फराळाचे साहित्य, नमकीन, भजी, वडे आणि घरगुती उपयोगासाठी तेलाची आवश्यकता मोठ्या प्रमाणात असते. त्यामुळे घाऊक व्यापाऱ्यांपासून ते



**किरकोळ बाजारात खाद्यतेलाचे प्रति किलो दर**


| खाद्यतेल | जुलै | ऑगस्ट |
|---|---|---|
| सोयाबीन | १३६ | १४० |
| राइस ब्रान | १४० | १४४ |
| मोहरी | १६० | १७० |
| पाम | १४० | १४५ |
| खोबरेल | ४५० | ५०० |
| सूर्यफूल | १६० | १६० |
| शेंगदाणा | १६० | १६० |
| जवस | १७० | १७० |

किरकोळ विक्रेत्यांपर्यंत दरात चढाओढ सुरू आहे.तेलाच्या किमतीत झालेली वाढ ३ केवळ घरगुती खर्चावर परिणाम करत नाही, तर त्याचा संपूर्ण अन्नसाखळीवर परिणाम होतो. हॉटेल्स, मिठाई दुकाने, तळलेले पदार्थ विक्रेते यांच्यासाठीही ही परिस्थिती चिंतेची आहे.

## पहिली आणि दुसरीच्या पुस्तकात कविता एकच, फक्त चित्र बदलले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती) यांचा एक नवीन गोंधळ समोर आला आहे. यामुळे विद्यार्थी, शिक्षक, पालक सारेच सभ्रमात आले आहेत. यावर्षीपासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सीबीएसईच्या धर्तीवर एकात्मिक पाठ्यपुस्तके तयार करण्यात आली आहेत.




या नवीन अभ्यासक्रमात भाषा, गणित, इंग्रजी आणि ‘खेळू, करू, शिकू’ या विषयांचा एकत्रित विचार करण्यात आला आहे. या अंतर्गत, इंग्रजी विषयाच्या अध्ययन निष्पत्तींमध्ये विद्यार्थ्यांना इंग्रजी शब्द, अक्षरे, त्यांचे उच्चार, कविता गायन, साध्या सूचना समजणे आणि स्वत:बद्दल बोलणे यासारख्या कौशल्यांचा समावेश आहे. मात्र, पाठ्यपुस्तकामध्ये फार मोठा गोंधळ झाल्याची माहिती समोर आली आहे.

पहिली आणि दुसरीच्या इंग्रजी विषयाच्या पाठ्यपुस्तकांमध्ये एकच कविता दिसून येतेय. ‘बर्ड्स कॅन फ्लाय’ कवितेचे नाव आहे. यामुळे पालक आणि शिक्षकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. यंदा प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी सीबीएसईच्या धर्तीवर नवीन पाठ्यपुस्तके तयार करण्यात आली आहेत. मात्र, या नवीन पुस्तकांमध्ये ही कविता दोन्ही वर्गांमध्ये जशीच्या तशी समाविष्ट करण्यात आल्याने यामागील हेतू आणि नियोजनाबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत.दोन वेगवेगळ्या वर्गांसाठी एकच कविता समाविष्ट करणे यातून पाठ्यपुस्तक निर्मितीतील निष्काळजीपणा दिसून येतो

## रक्षाबंधन आणि स्वातंत्र्यदिनानिमित्ताने नागपूर, पुणे, मुंबई विशेष रेल्वे धावणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६नागपूर**

रक्षाबंधन आणि स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर लांब सुट्ट्यांदरम्यान प्रवाशांची वाढलेली गर्दी लक्षात घेता, मध्य रेल्वे १८ विशेष ट्रेन चालवणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते नागपूर - ६ सेवा, लोकमान्य टिळक टर्मिनस ते मडगाव - ४ सेवा, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते कोल्हापूर - २ सेवा, पुणे ते नागपूर - ६ सेवाचा समावेश आहे.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस - नागपूर विशेष ट्रेन (२ सेवा) : विशेष ट्रेन ०९.०८.२०२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराज



टर्मिनस, मुंबई येथून ००.२० वाजता सुटेल आणि नागपूर येथे त्याच दिवशी १५.३० वाजता पोहोचेल. (१ सेवा)

नागपूर ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस विशेष ट्रेन १०.०८.२०२५ रोजी नागपूर येथून १४.३० वाजता सुटेल आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई येथे दुसऱ्या दिवशी ०५.२५ वाजता पोहोचेल. (१ सेवा) या गाडीला दादर, ठाणे, कल्याण, इगतपुरी, नाशिक रोड, मनमाड, जळगाव, भुसावळ, माळकापूर, शेगाव, अकोला, मुर्तिजापूर, बडनेरा, धामणगाव आणि वर्धा येथे थांबे असतील. या गाडीला २ वातानुकूलित तृतीय, १२ शयनयान, ६ सामान्य द्वितीय, २ द्वितीय आसन व्यवस्था व सामान गार्ड ब्रेक व्हॅन डबे राहतील.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस - नागपूर विशेष ट्रेन (४ सेवा) : विशेष ट्रेन १५.०८.२०२५ आणि १७.०८.२०२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई येथून ००.२० वाजता सुटेल आणि नागपूर येथे त्याच दिवशी १५.३० वाजता पोहोचेल. (२ सेवा)

नागपूर ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस विशेष ट्रेन १५.०८.२०२५ आणि १७.०८.२०२५ रोजी नागपूर येथून २०.०० वाजता सुटेल आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई येथे दुसऱ्या दिवशी १३.३० वाजता पोहोचेल. (२ सेवा) या गाडीला दादर, ठाणे, कल्याण, इगतपुरी, नाशिक रोड, मनमाड, जळगाव, भुसावळ, मलकापूर, शेगाव, अकोला, मुर्तिजापूर, बडनेरा, धामणगाव आणि वर्धा थांबे असतील. या गाडीला २ वातानुकूलित तृतीय, १२ शयनयान, ६ सामान्य द्वितीय, २ द्वितीय आसन व्यवस्था व सामान गार्ड ब्रेक व्हॅन असेल.

## संपादकीय ......

# निवडणुकांचा मार्ग मोकळा....

स्थानिक स्वराज्य संस्था हा लोकशाहीचा पाया. विकेंद्रित लोकशाहीची प्रक्रिया अगदी तळापासून सुरू होते. त्यामुळे हा पाया बळकट करण्यासाठी या निवडणुका महत्त्वाच्या. लोकसभा - विधानसभा निवडणुकांप्रमाणेच त्यांनाही तितकेच महत्त्व. सर्वोच्च न्यायालयाने चार महिन्यांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची प्रक्रिया पूर्ण करण्याचा आदेश मे महिन्यात दिला होता. ती मुदत सप्टेंबरमध्ये संपणार आहे.अर्थात, मुदतवाढ मागून घेण्याचा पर्यायही न्यायालयाने दिलेला आहे. सध्या प्रभाग रचनेचे काम सुरू असून, ही प्रक्रिया ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करण्याची मुदत नगरविकास विभागाने सर्व पालिकांना दिली आहे. प्रभाग रचनेचे प्रारूप तयार झाल्यावर हरकती व सूचना मागवण्यासाठी काही अवधी द्यावा लागतो आणि त्यावर सुनावणी घ्यावी लागते. त्यामुळे ही सर्व प्रक्रिया पूर्ण होण्यास नोव्हेंबर उजाडणार, हे नक्की. या स्थितीत महापालिकांच्या निवडणुका पुढील वर्षीच होतील, अशी शक्यता व्यक्त केली जाते; मात्र त्याचवेळी राज्यातील रखडलेल्या महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका २७ टक्के ओबीसी आरक्षणासह आणि नव्या प्रभाग रचनेनुसार होतील, हे आता पुरेसे स्पष्ट झाले. कारण, याला आव्हान देणार्या याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावल्या.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी नवीन प्रभाग रचना करण्याचा अधिकार राज्य सरकारला आहे. त्यामुळे त्यात हस्तक्षेप केला जाणार नाही, हा न्यायालयाचा निर्णय महत्त्वाचा आहे. आता महापालिका, नगरपालिका आणि जिल्हा परिषदांच्या निवडणुका नवीन प्रभाग रचनेनुसार होतील. निवडणुकीत एकसदस्यीय प्रभाग असावा की बहुसदस्यीय, असा वाद आहे. प्रभाग हे महापालिका क्षेत्रातील प्रशासकीय कामांसाठी आखले जातात. त्या प्रभागातील स्वच्छता, पाणीपुरवठा वगैरे कामे सुरळीत व्हावीत आणि त्यावर नियंत्रण ठेवणे सोपे जावे, यासाठी ही रचना अस्तित्वात आली. पुढे निवडणुकांसाठीही प्रभागावर आधारित मतदारसंघाची रचना निश्चित झाली. बहुसदस्यीय प्रभाग पद्धतीत होणार्या निवडणुकीची राजकीय गणिते आणि समीकरणेही लगेच बदलतात.

कारण, एकाच प्रभागातून पूर्वनिर्धारित एकापेक्षा जास्त नगरसेवक निवडून आणायचे असतात. डिसेंबर २०१९ मध्ये बहुसदस्यीय प्रभाग पद्धतीच बंद झाली. मार्च २०२० मध्ये एकसदस्यीय वॉर्ड पद्धत पुन्हा लागू झाली. ऑक्टोबर २०२१ मध्ये महाविकास आघाडी सरकारने हा निर्णय बदलला आणि बहुसदस्यीय प्रभाग पद्धत आली. एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री झाल्यानंतर यात बदल केला. २०१७च्या निर्णयाप्रमाणे म्हणजेच एका प्रभागात तीन नव्हे, तर चार सदस्य निवडीची पद्धत लागू केली. विशेष म्हणजे, महाविकास आघाडीसाठी ऑक्टोबर २०२१ मध्ये नगरविकासमंत्री या नात्याने शिंदे यांनीच त्रिसदस्यीय प्रभागांचा निर्णय जाहीर केला होता; पण मुख्यमंत्री बनताच आपलाच जुना निर्णय त्यांनी फिरवला, अशी टीकाही झाली.

आता २०१७ मध्ये झालेल्या प्रभाग रचनेनुसारच निवडणुका होणार आहेत. २०२२ मध्ये जी प्रभाग रचना झाली त्याप्रमाणे निवडणूक घ्या, अशी याचिकाकर्त्याची मागणी असली, तरी महायुती सरकारने तो कायदाच रद्द केला होता, याची दखल न्यायालयाने घेतली. पुण्यासारख्या शहरात ३२ गावांच्या समावेशामुळे प्रभाग रचनेत बरेच बदल झाल्याची चर्चा सुरू आहे; पण त्याचवेळी २०१७ची प्रभाग रचना प्रमाण मानून २०२५ची रचना याच पद्धतीने केल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले. ओबीसी प्रवर्गाच्या २७ टक्के आरक्षणाला आव्हान देणारी याचिका फेटाळून लावल्याच्या निर्णयाचे स्वागत झाले.

ओबीसींना २०२२ पूर्वी प्राप्त असलेले आरक्षण कायम ठेवत पुढील चार महिन्यांच्या आत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पाडाव्यात आणि त्यासाठी महिन्यात अधिसूचना जारी करावी, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने गेल्या मे महिन्यातच दिले होते. यासंबंधीचा बांठिया आयोगाचा अहवाल तीन वर्षांपूर्वीच सादर झाला होता. या पार्श्वभूमीवर १९९४ ते २०२२ या काळात अवलंबलेल्या ओबीसी आरक्षण प्रणालीनुसारच निवडणुका घेतल्या जाव्यात, असा न्यायालयाचा आदेश असून, त्यामुळे याबाबतची अनिश्चितता एकदाची संपली. या निवडणुकीत आता सर्वच जिल्ह्यांत ओबीसी आरक्षण राहणार असून, या समाजातील अन्यायाची भावना यामुळे दूर होण्यास मदत होईल अशी आशा आहे. राज्यातील ओबीसी समाजाच्या नेत्यांनी निर्णयावर समाधान व्यक्त केले आहे. या निर्णयाने सामाजिक न्यायाच्या लढाईस बळ मिळणार आहे.ओबीसी आरक्षण कायम ठेवल्यामुळे काही जिल्ह्यांत आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा पार होऊन, पुन्हा नव्याने वाद निर्माण होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. धुळे, नंदुरबार, गडचिरोली, पालघर अशा महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये अनुसूचित जमातींची लोकसंख्या जास्त असल्यामुळे तेथे या वर्गासाठी अधिक आरक्षण आहे. त्यातून ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडली जाते. म्हणूनच याबाबत अधिक खुलासा होण्याची गरज आहे. मुंबईसह राज्यातील २९ महानगरपालिका, २६ जिल्हा परिषदा, २५७ नगरपालिका आणि २८९ नगर पंचायतींच्या निवडणुका काही वर्षांपासून रखडलेल्या आहेत. इचलकरंजी आणि जालना या तर नव्याने अस्तित्वात आलेल्या महापालिका आहेत आणि त्या त्यांच्या पहिल्या निवडणुकीची अद्याप प्रतीक्षा करत आहेत. निवडणुका लांबणीवर पडत असल्यामुळे लोकांची असंख्य कामे अडली आहेत.रस्त्यांवरचे खड्डे, गटारे व नाल्यांची साफसफाई, पाण्याच्या पाईपलाईनची दुरुस्ती, वॉर्डच्या इस्पितळामधील सुविधा याबद्दलची गार्हाणी घेऊन जनता लोकप्रतिनिधींकडे जात आहे; मात्र जागेवर लोकनियुक्त प्रतिनिधीच नसल्याने सार्वजनिक कामे ठप्प आहेत. ही कोंडी मोठ्या विलंबानंतर फुटणार आहे. आता लवकरात लवकर निवडणुका होऊन, नवे लोकप्रतिनिधी निवडले गेले की, ठप्प झालेली लोकशाही प्रक्रिया गतिमान होईल, हीच अपेक्षा!

# पोरगव्हाण येथील शेतकऱ्यांची रस्त्याच्या मागणीसाठी आक्रोश

## रस्त्याअभावी शेती व शेतीमाल वाहतुकीस अडथळा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६मोर्शी:** - मोर्शी तालुक्यातील पोरगव्हाण येथील शेतकऱ्यांना शेतीसाठी वापरता येईल असा रस्ता नसल्याने मोठ्या प्रमाणात अडचणींचा सामना करावा लागत आहे. मागील दोन वर्षांपूर्वी ग्रामपंचायतीने ठराव मंजूर करूनही आजपर्यंत रस्ता मंजूर झालेला नाही. यामुळे शेतकरी वर्गामध्ये संतापाचे वातावरण आहे.



शेतकऱ्यांच्या माहितीनुसार, गावातील सुमारे ५० ते ६० शेतकऱ्यांची शेकडो एकर शेती या रस्त्याच्या मार्गावर आहे. मात्र रस्त्याअभावी शेतकरी आपल्या शेतीमालाची वेळेवर वाहतूक करू शकत नाहीत. विशेषतः संत्रा, मोसंबी यासारख्या फळपिकांचा माल बाजारपेठेत नेताना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. ट्रॅक्टर किंवा ट्रक शेतापर्यंत पोहोचू शकत नसल्याने बैलबंडीने माल मुख्य रस्त्यावर आणावा लागतो, ज्यामुळे वेळ आणि खर्च दोन्ही वाढतो.

त्याचप्रमाणे खते, बियाणे, औषधे यांचा पुरवठा वेळेवर होत नाही. त्यामुळे पेरणीपासून ते काढणीपर्यंत शेतीच्या प्रत्येक टप्प्यावर अडथळे येत आहेत. आधुनिक शेतीसाठी आवश्यक असलेली यंत्रसामग्री जसे की ट्रॅक्टर, रोटाव्हेटर, हार्वेस्टर हे अवजारे शेतात पोहोचवणे अशक्यप्राय झाले आहे.

शासनाच्या योजनाही अंमलबजावणीअभावी तोकड्याशासनाने शेती रस्ते उपलब्ध करून देण्यासाठी विविध योजना जाहीर केल्या आहेत, मात्र त्यांची अंमलबजावणी अजूनही प्रभावीरीत्या होताना दिसत नाही. अनेक वेळा स्थानिक प्रशासनाकडे तक्रारी करूनही फक्त आश्वासनांचीच मालिका मिळत आहे, असा शेतकऱ्यांचा आरोप आहे.

रस्त्याअभावी नुकसान आणि आर्थिक तोटारस्त्याच्या अभावामुळे अनेक वेळा माल शेतातच पडून राहतो किंवा तो कमी किमतीत विकावा लागतो. परिणामी, शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागते. याचा थेट परिणाम त्यांच्या वार्षिक उत्पन्नावर होतो. अनेक शेतकरी बँकेचे कर्ज घेऊन शेती करतात. मात्र योग्य सुविधा नसल्याने त्यांचं उत्पन्न घटत आहे, आणि कर्जफेडही अडचणीत आली आहे.

रस्ता मंजूर न झाल्यास उग्र आंदोलनाचा इशारापोरगव्हाण येथील शेतकऱ्यांनी स्पष्ट शब्दात सांगितले आहे की, जर लवकरात लवकर रस्ता मंजूर करून काम सुरू झाले नाही, तर गावातील सर्व शेतकरी एकत्र येऊन तीव्र आंदोलन छेडतील. याबाबतचे निवेदन संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले असून आता शासनाने गांभीर्याने लक्ष घालावे, अशी मागणी शेतकरी वर्गाकडून केली जात आहे.




# तुमचं हृदय खरंच फिट आहे का? घरच्या घरी १ मिनिटांत कळेल आरोग्याचं रहस्य!

**दि.६विदर्भ प्रजासत्ताक**

आजच्या धावपळीच्या जीवनात आणि बदलत्या जीवनशैलीमुळे हृदयविकाराचा धोका वाढतो आहे. अशावेळी आपलं हृदय किती मजबूत आणि निरोगी आहे, हे जाणून घेण्याची इच्छा प्रत्येकालाच असते. पण यासाठी प्रत्येक वेळी महागड्या वैद्यकीय चाचण्यांची गरज असतेच असे नाही. 'हार्ट रेट रिकव्हरी' नावाची एक अत्यंत सोपी आणि वैज्ञानिक चाचणी तुम्ही घरच्या घरीच करू शकता, जी तुमच्या हृदयाच्या आरोग्याबद्दल अत्यंत महत्त्वाची माहिती देते.



'हार्ट रेट रिकव्हरी' या सोप्या चाचणीद्वारे तुम्ही घरच्या घरीच तुमच्या हृदयाचे आरोग्य तपासू शकता.यासाठी फक्त एक मिनिट व्यायाम करून आणि त्यानंतर एक मिनिट विश्रांती घेऊन तुमच्या हृदयाच्या ठोक्यांमधील फरक मोजला जातो.जर हा फरक १२ किंवा त्याहून अधिक असेल, तर ते उत्तम आरोग्याचे लक्षण मानले जाते, तर कमी फरक असल्यास जीवनशैलीत सुधारणा करण्याची गरज असल्याचे ते दर्शवते.ही सोपी चाचणी तुमच्या हृदयाच्या कार्यक्षमतेचा आणि दीर्घायुष्याचा एक महत्त्वाचा वैज्ञानिक निर्देशक आहे.

### काय आहे 'हार्ट रेट रिकव्हरी' ?

सोप्या भाषेत सांगायचे तर, व्यायामानंतर तुमचे हृदय किती लवकर सामान्य ठोक्यांवर परत येते, हे मोजणारी ही एक पद्धत आहे. ज्याप्रमाणे एखादी गाडी वेगाने चालवून आल्यावर तिचे इंजिन हळूहळू थंड होते, त्याचप्रमाणे निरोगी आणि मजबूत हृदय कोणत्याही श्रमानंतर वेगाने शांत होते. हृदयाची ही क्षमता तुमच्या हृदय व फुफ्फुसांच्या एकूण कार्यक्षमतेचे आणि फिटनेसचे प्रतीक मानली जाते.

आता तुमच्याकडे दोन आकडे आहेत. यावरून तुमच्या हृदयाचे आरोग्य कसे आहे ते खालीलप्रमाणे तपासा:

**फॉर्म्युला: = (व्यायामानंतरचे पहिले हार्ट रेट) - (एक मिनिटाच्या विश्रांतीनंतरचे हार्ट रेट)**

**उत्तम आरोग्य:** जर तुमच्या दोन्ही नोंदींमधील फरक १२ किंवा त्यापेक्षा जास्त असेल, तर हे तुमच्या हृदयाचे आरोग्य आणि फिटनेस उत्तम असल्याचे लक्षण आहे. याचा अर्थ तुमचे हृदय व्यायामाच्या ताणानंतर स्वतःला वेगाने सामान्य स्थितीत आणण्यास सक्षम आहे.

**सुधारणेची गरज** : जर हा फरक १२ पेक्षा कमी असेल, तर याचा अर्थ तुमच्या हृदयाच्या फिटनेसमध्ये सुधारणेला वाव आहे. घाबरून जाण्याचे कारण नाही, पण नियमित व्यायाम, संतुलित आहार आणि तणाव व्यवस्थापनावर अधिक लक्ष केंद्रित करण्याची ही एक महत्त्वाची सूचना आहे.

# शेतकऱ्यांनो पिकांवरील अशी औषध फवारणी ठरू शकते जीवघेणी; कशी घ्याल काळजी?

**दि.६विदर्भ प्रजासत्ताक**

सध्या पिकांवर तणनाशक, कीटकनाशक फवारणी सुरू आहे. उपाशीपोटी राहणे किंवा तंबाखू, धूम्रपान, मद्यपान करून विषारी कीटकनाशकांची फवारणी केल्यामुळे दरवर्षी अनेक जणांना विषबाधेला सामोरे जावे लागते.त्यासाठी फवारणीदरम्यान हात स्वच्छ धुवावे, फवारणी झाल्यानंतरच तोंडाला स्पर्श करावा, फवारणी करताना तंबाखू चोळणे, जेवण करणे धोकादायक ठरू शकते. यातून विषबाधा होण्याचा धोका अधिक असतो.

फवारणीसाठी वापरण्यात येणाऱ्या रसायनांमध्ये रेड मार्क असलेली कीटकनाशके अत्यंत विषारी मानली जातात. अशा रसायनांची फवारणी करताना त्याचा मानवी शरीरावर आणि श्वसनमार्गावर परिणाम होऊ शकतो.

त्यामुळे शेतकऱ्यांनी शक्यतो सायंकाळच्या वेळेस, अन्न सेवन केल्यानंतर आणि योग्य संरक्षक साधनांचा वापर करूनच फवारणी करावी, असा सल्ला कृषी विभागाने दिला आहे.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

### फवारणी करताना अशी घ्यावी काळजी

फवारणी करताना काही महत्त्वाच्या गोष्टी लक्षात ठेवाव्यात लागणार आहेत. योग्य कीटकनाशक निवडून त्याचा वापर करावा.

फवारणी करताना सुरक्षेची साधने जसे मास्क, ग्लोव्हज, गॉगल्स आणि फवारणी सूट वापरणे आवश्यक आहे.

- फवारणी सकाळी किंवा संध्याकाळी केली पाहिजे.
- फवारणी करताना नळीमध्ये अडथळा आल्यास तोंडाने फुंकर मारणे टाळावे. यामुळे कीटकनाशक तोंडातून आत जाऊन विषबाधा होण्याची शक्यता असते.
- आपल्या आरोग्याची काळजी घेत कीटकनाशक फवारणी करणे गरजेचे आहे.
- लहान मुले, आजारी, वृद्ध व्यक्ती सोबत नकोत
- कीटकनाशकांच्या प्रभावामुळे लहान मुले, आजारी, वृद्ध व्यक्तीच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतात. वृद्ध व्यक्तींचे शरीरदेखील कीटकनाशकांचा सामना करण्यासाठी कमकुवत असू शकते. यामुळे फवारणी करताना काळजी घ्यावी लागणार आहे.
- ऑगस्ट, सप्टेंबरमध्ये सतर्कता गरजेची




शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

- ऑगस्ट महिना हा पिकांच्या वाढीसोबत फळधारणेसाठी महत्त्वाचा असतो. पावसाने उघडीप दिल्याने शेतकरी किडीचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी फवारणी करत आहेत. कृषी विभागाने शेतकऱ्यांमध्ये सजगता निर्माण व्हावी यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत.
- विषबाधेची लक्षणे
- डोळ्यांची किंवा त्वचेची जळजळ, उलटी, चक्कर येणे, श्वास घेण्यास अडचण, थकवा आणि पोटदुखी ही विषबाधेची सामान्य लक्षणे आहेत.

अशी कोणतीही लक्षणे दिसून आल्यास त्वरित वैद्यकीय मदत घेणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे काळजी घेणे गरजेचे आहे.

### विषबाधा झाल्यास काय कराल?

विषबाधा झालेल्या व्यक्तीला ताबडतोब स्वच्छ आणि मोकळ्या हवेत जाऊन बसावेत. जर विषारी औषध डोळ्यात गेले असेल, तर डोळे स्वच्छ पाण्याने १० ते १५ मिनिटे धुवावेत. लगेच डॉक्टरकडे घेऊन जावे. उपचारांसाठी जाताना फवारणी केलेल्या कीटकनाशकाची बाटली सोबत घेऊन जायेत जेणेकरून योग्य उपचार करता येतील.

# राष्ट्रसंतानी जीर्णोद्धार केलेले वणी (बेलखेडा) येथील नंदकेश्वर शिवमंदिर

**सागर सवळे**
**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६चांदूरबाजार**

सातपुड्याच्या पायथ्याशी निसर्गरम्य परिसराने वेढलेल्या वणी (बेलखेडा) या आडवळणाच्या खेडेगावात वैराग्यमुर्ती गाडगेबाबांचे सानिध्य लाभले आहे. त्यामुळेच अनेक संतांचा पदस्पर्श या परिसराला झाला. या वणी (बेलखेडा) गावाला प्रगल्भइतिहास लाभला आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी जिर्णोध्दार केलेले येथील नंदकेश्वर शिवमंदिर या भागाची महती पटवून देण्यासाठी पुरेसे आहे.हिरवळीने वेढलेल्या परिसरात असलेले नंदकेश्वर शिवालयात तब्बल २५० वर्षे पुरातन मंदिर आहे. या मंदिरात प्रवेश करताच समोर श्री शंकराचे स्वयंभू शिवलिंग आणि दोन नंदी नजरेस पडतात.(कलर बॉक्स)......श्रावणमास व शिवरात्रीला वर्दळ हे शिवलिंग पंचक्रोशीतील हजारो भाविकांचे श्रध्दास्थान आहे. येथे दर्शनासाठी शिवभक्तांची सतत वर्दळ असते. प्रामुख्याने श्रावणमासातील सोमवार आणि महाशिवरात्रीला येथे शिवभक्त मोठी गर्दी करतात. जागृत म्हणून ख्याती असलेल्या या परिसरातील प्राचीन वटवृक्ष परिहराच्या नैसर्गिक सौंदर्यात भर टाकतो. येथे तिर्थक्षेत्र विकास निधीतून दोन सभागृह बांधण्यात आले आहे.श्री गणेशासह श्री गजानन महाराजांची आकर्षक मुर्ती मंदिरात विराजमान आहे. त्याच्या बाजुलाच असलेला त्रिशुल आणि धनुष्यबाण मंदिराची शोभा वाढवितो. श्रीकिसनजी महाराज यांनी या मंदिराची स्थापना केली होती. मंदिर परिसरातच देह ठेवणाऱ्या श्रीकिसनजी महाराज यांची समाधी येथेच आहे. सुरवातीला येथिल शिवलिंगाचा आकार लहान होता. कालांतराने तो वाढत गेला.



### १९३७ मध्ये भागवत कथा

या शिवालयाच्या जीर्णोध्दारासाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी १९३७ साली पुढाकार घेतला होता. त्याच वर्षी २७ मार्च ते २ एप्रिल या कालावधीत राष्ट्रसंतांनी येथे भागवत सप्ताहाचे आयोजन केले होते. या उत्सवासाठी अनेक संतांचे या भुमीत आगमन झाले होते. श्रीकिसनजी महाराज यांचे या आयोजनात महत्वाचे योगदान होते. राष्ट्रसंतांच्या पुढाकारानंतर शिवालयाच्या जीर्णोध्दारासाठी श्रीकिसनजी महाराज सातत्याने प्रयत्नरत होते. त्यांनी येथील शिवलिंगाची नियमित पुजा अर्चा केली. आणि याच ठिकाणी १२ जुन १९९० रोजी देह ठेवला. त्यांच्या प्रयत्नातूनच येथे सर्वप्रथम सितारामबाबा धर्मशाळा बांधण्यात आली.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा
Scan this QR code using the WhatsApp camera to join this group

# विदर्भ प्रजासत्ताक

बुधवार दि. ६ ऑगस्ट २०२५ शहर/ग्रामिण

# २०० गावांतील स्मशानभूमी विकासाला चालना

## पालकमंत्र्यांच्या सूचनेनंतर 'डीपीसी'तून मिळणार निधी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६अमरावती** – ज्या गावांत स्मशानभूमी नाही, अशा गावात सोयीसुविधांयुक्त स्मशानभूमी साकारली जाणार आहे. पहिल्या टप्प्यात २०० गावांत स्मशानभूमी निर्माण करण्याचे प्रस्तावित असून त्याकरिता ग्रामपंचायतीकडून नव्याने प्रस्ताव मागविले आहे. त्याकरिता जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यपालन अधिकारी संजीत महापात्र यांनी पुढाकार घेतल्याची माहिती आहे.

अमरावती जिल्ह्यात सुमारे ७०० अशी गावे आहेत, जिथे



### जिल्ह्यात २८५ गावे स्मशान भूमीविनाच

७०० गावांमध्ये स्मशानभूमीकरिता जागा आहे, परंतु सुविधा नाही

विदर्भ प्रजासत्ताक दि.२६अमरावती : निधनानंतर मानवी शरीर जेथे अनंतात विलिन होते, ती जागाच मुळात गावात नसणे, म्हणजे मोठी शोकांतिका म्हणावी लागेल. जिल्ह्यात अशा २८५ गावांमध्ये मोक्षप्रामीकरिता जागाच नाही. त्यामुळे अंत्यविधी कुठे करावा, असा प्रश्न गावकर्यांना पडतो. परिणामतः नागरिकांमध्ये रोष वाढत आहे. या गावांमध्ये स्मशानभूमीकरिता जागा देण्याची मागणी जोर धरत आहे. याशिवाय सातशे गावांमध्ये जागा आहे. परंतु शेडच नाही. त्यामुळे स्मशानभूमीकरिता जागा आणि सुविधा देण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.गाव तिथे स्मशानभूमी असे शासनाचेच धोरण आहे. निधनानंतर त्या मानवी शरीरावर अंत्यविधीचे सोपस्कार व्यवस्थित करता यावे याकरिता बहुतांश गावांमध्ये स्मशानभूमीकरिता लाखो रुपये मंजुर करून सुसज्ज स्मशानभूमी निर्माण करण्यात आल्या आहेत येथे शेडसह पाणी व रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण देखील करण्यात आले आहे.परंतु जिल्ह्यात आजही असे गावे आहेत तेथे स्मशानभूमीच नाही. त्यामुळे त्यांना नजिकच्या गावांमध्ये जाऊन अंत्यविधी करावा लागतो. काही गावांमध्ये जागा परंतु सुविधा नाही, तेथे शेड देखील नाही. जिल्ह्यात ८४१ ग्रामपंचायती अंतर्गत १६१८ गावे आहेत. यामध्ये ९१८ गावांमध्ये सुविधांसह स्मशानभूमी आहे. परंतु ७०० गावांमध्ये जागा असून शेड नाही. तर २८५ गावांमध्ये स्मशानभूमीकरिता जागाच उपलब्ध नाही. त्यामुळे अंत्यसंस्कार कुठे करावा, असा प्रश्न त्यांना पडतो. यातील कित्येक गावांमध्ये जागांकरिता महसूल विभागांकडे प्रस्ताव गेले आहे. परंतु यावर अद्याप कारवाई झाली नाही. त्यामुळे स्मशानभूमीकरिता जागा आणि तेथे सुविधा देण्यात याव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

### ग्रामपंचायतींवर प्रस्ताव पाठविण्याची जबाबदारी

ज्या गावांत स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध आहे, त्या ग्रामपंचायतींना माहिती देण्यात आली आहे. त्यांनी प्रस्ताव तयार करून त्या जागेचे हस्तांतरण करण्याची प्रक्रिया पूर्ण करणे ही त्यांची जबाबदारी आहे. त्यामुळे ही प्रक्रिया त्यांच्याकडून तातडीने पूर्ण केली जावी. त्याचप्रमाणे ज्या गावांमध्ये जागा नाही, त्यांच्यासाठी जागेचा प्रस्ताव तयार करावा. आणि ज्या गावांपध्ये स्मशानभूमीपर्यंत जाणारा रस्ता नाही, अशा गावातील नागरिकांनी पालकमंत्री कार्यालयात स्मशानभूमीच्या निर्मितीसाठी निधीसाठी निवेदन देऊ शकतात, असे पालकमंत्री कार्यालयाकडून कळविण्यात आले आहे.

## दैनिक विदर्भ प्रजासत्ताक च्या बातमीची दखल

अंतिम संस्कारासाठी स्मशानभूमीला शेड उपलब्ध नाही. या मुद्द्यावर लोकप्रिय सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक मध्ये' २६ जुले रोजी जिल्ह्यात २८५ गावे स्मशानभूमीविनाच ही बातमी प्रकाशित केली होती. त्या बातमीची दखल जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या कार्यालयाकडून घेण्यात आली.

दरम्यान, जिल्हा परिषद प्रशासनाकडून स्मशान शेड तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. स्मशान शेडसाठी जिल्हा नियोजन समितीकडून निधी दिला जाईल, असे पालकमंत्री बावनकुळे यांनी निर्णय घेतला आहे.

गावांमध्ये स्मशानभूमी शेड तयार करण्यासाठी जिल्हा नियोजन समितीने ग्रामपंचायतींकडून नव्याने प्रस्ताव मागविले.पहिल्या टप्प्यात २०० गावांत शेड होणार आहे.

**– संजीता महापात्र, सीईओ,अमरावती**



# मान्सूनपुर्व कामे पुर्ण करणार केव्हा ? विद्युत ग्राहकांचा सवाल ;कामे अर्धवट!

## विद्युत खंडित होण्याचे वाढले प्रमाण ; ग्रामस्थांची गैरसोयीत वाढ



**विदर्भ प्रजासत्ताक दि.६अचलपूर** अचलपूर विभागातील येणाऱ्या बऱ्याच उपविभागात काही ठिकाणी विद्युत खांब व तारेवर झाडांच्या फांद्या कायम असुन कुठे विद्युत खांब वाकलेले आहेत. गेल्या काही दिवसात विद्युत पुरवठा खंडीत होण्याचे प्रमाण वाढले असुन नागरिकांच्या गैरसोयीत वाढ झाली आहे. मान्सून सुरू होऊन एक महिना झालेला असला कामे अपूर्णच आहे त्यामुळे अर्धवट असलेले मान्सूनपूर्वकामे केव्हा करणार ?असा सवाल ग्राहक विचारत असुनझालेल्या कामावर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येत आहे. महावितरण कडून दरवर्षी मान्सूनपूर्व देखभाल दुरुस्तीची कामे केल्या जातात. यामध्ये विद्युत उपकरण दुरुस्ती , तसेच लोंबकळत्या विद्युत तारा ,तिरपे खांब अथवा विद्युत तारेवर आलेल्या झाडाच्या फांद्याची कटिंग आदी कामे केल्या जात असुन यावर दरवर्षी मोठा निधी खर्च करण्यात येतो. मात्र ऑगस्ट महिना उजाळला असताना अचलपूर विभागातील बऱ्याच उपविभागातील काही भागांमध्ये सध्याही विद्युत खांब व विद्युत वाहिन्यांवर झाडांच्या फांदया तोडल्या गेल्या नाहीत. कुठे विद्युत खांब तिरपे तर तारा लोंबकळत असल्याचे चित्र आहे.विद्युत पुरवठा खंडित होण्याचे प्रमाण वाढले असुन अपघाताचा धोका बळावला असल्याची ओरड आहे. गेल्या काही दिवसात विद्युत पुरवठा खंडित होत असल्याने विद्युत ग्राहकांना गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. ऑगस्ट महिना उजाळला तरीही मान्सूनपूर्व कामे न झाल्याने नेमके कामे होणार केव्हा ?असा सवाल आता विद्युत ग्राहक विचारत आहेत. तर झालेल्या कामावरही प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येत आहे. महावितरण विभागाच्या वरिष्ठांनी याकडे लक्ष द्यावे. झालेल्या कामाची चौकशी करावी. अर्धवट असलेले कामे तातडीने पुर्ण करावे. अशी मागणी विद्युत ग्राहकांकडून पुढे येत आहे.

पावसाळा सुरू होण्यापूर्वी मे महीन्यात किंवा जुन अखेरपर्यंत मानसून पूर्व कामे होणे अपेक्षित आहे मात्र सध्या ऑगस्ट महिना उजाळला असतानाही मान्सूनपूर्वकामे अर्धवट असल्याने महावितरणच्या कामे व नियोजनाबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येत असून वरिष्ठ याकडे केव्हा लक्ष देणार ? असा सवाल ही विद्युत गाहकांकडून उपस्थित करण्यात येत आहे

### जिल्ह्यात महसुली तंटामुक्तीसाठी अभियान राबविणार

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अभियानात गावांना पुरस्कार

**विदर्भ प्रजासत्ताकदि. ५ : अमरावती** – पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीचे औचित्य साधून सुप्रशासन राबविण्यासाठी गावस्तरावर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महसुली तंटामुक्त गाव अभियान जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येणार आहे. यात तालुकानिहाय प्रथम येणाऱ्या ग्रामपंचायती आणि जिल्हास्तरावर गुणानुक्रमे पहिल्या तीन ग्रामपंचायतींचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात येणार आहे.न्यायालयात दाखल होणाऱ्या दाव्यांमुळे विलंबाने निर्णय होत आहे. त्यामुळे पर्यायी व्यवस्था निर्माण करण्याची आवश्यकता विचारात घेऊन महसुली तंटामुक्त गाव अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानात अधिकार अभिलेखात पुरूषांसोबत त्याच्या पत्नीचे नाव दाखल करणे, अधिकार अभिलेखाच्या अनुषंगाने प्रलंबित नोंदीचा निपटारा करणे, जिल्ह्यातील सर्व स्तरावरील महसूल विषयक तंटे सामंजस्याने सोडविणे, पाणंद, शेतरस्त्याचे तंटे ग्रामस्तरावर सोडविणे, हद्दीवरून वहिवाटीचे असणारे वाद सोडविण या पाच प्रमुख मुद्यांवर भर दिला जाणार आहे. सदरचे अभियान १ ऑक्टोबर ते ३१ मार्च या कालावधीत राबविण्यात येणार आहे. अभियानात पुरस्कार हा रोख स्वरूपात मिळणार आहे. ग्रामपंचायतींना ही रक्कम गावातील विकास कामासाठी करता येणार आहेसदरचे अभियान हे ग्रामपंचायतस्तरावर राबविण्यात येणार आहे. यासाठी ग्रामस्तरीय समिती असणार आहे. या समितीत ग्रामसभेने निवडलेला व्यक्ती अध्यक्ष, तर सरपंच, उपसरपंच, विविध समित्यांचे प्रतिनिधी, व्यापारी, पोलिस, माजी सैनिक, निवृत्त न्यायाधीश, निवृत्त पोलिस अधिकारी, महिला बचत गट आदींचे प्रतिनिधी सदस्य म्हणून राहणार आहे. ग्राम महसूल अधिकारी सदस्य सचिव राहणार आहे. ग्रामस्तरीय समितीकडून आलेले प्रस्ताव तालुकास्तरीय समिती मुल्यमापन करून जिल्हास्तरीय समितीकडे पाठविणार आहे. तहसिलदारांच्या अध्यक्षतेखाली तालुकास्तरीय समिती असणार आहे. तसेच तालुकास्तरीय समितीकडून आलेले प्रस्ताव तपासणी करणे आणि अंतिम गुणांकन करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती स्थापन करण्यात येणार आहे.गावपातळीवर सर्वसाधारणपणे क्षुल्लक कारणामुळे महसुली तंटे सुरू होतात. क्षुल्लक तंट्याचे निराकरण पूर्वीप्रमाणे गावपातळीवर शक्य नसल्याने पर्यायाने न्यायालयीन कामाचा ताण वाढतो आहे. तसेच राज्यात साक्षरता अधिक असताना नागरिकांमध्ये कायदेविषयक साक्षरता अपेक्षित पातळीपर्यंत पोहोचली नसल्याने महसुली तंटचाचे प्रमाण वाढलेले आहे. त्यामुळे ऑक्टोबरपासून पुढील सहा महिन्यापर्यंत महसुली तंटामुक्तीसाठी गावागावात पुढाकार या अभियानातून घेण्यात येणार आहे.पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महसुली तंटामुक्त गाव अभियान प्रभावीपणे राबविल्यास सहा महिन्यात आपसी वाद मिटण्यास मदत होणार आहे. तसेच येत्या दोन वर्षात गावात महसुली तंटे होणार नाही. त्यामुळे गावागावात शांततेचे वातावरण निर्माण होऊन विधायक कार्य घडण्यास मदत होणार आहे. त्यामुळे जिल्ह्यातील प्रत्येक गावाने या अभियानात सहभागी व्हावे, असे आवाहन पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले आहे.



# वर्ग अकरावीच्या प्रवेशासाठी शिवसेनेच्या नेतृत्वात विद्यार्थ्यांचा शिक्षण उपसंचालक कार्यालयात घेराव

### प्रवेश क्षमतेत वाढीसाठी दोन दिवसांचा अल्टिमेटम; मान्यता न मिळाल्यास आंदोलनाचा इशारा



**विदर्भ प्रजासत्ताक दि.६अमरावती** नांदगाव खंडेश्वर येथील शिवाजी महाविद्यालयाच्या विज्ञान शाखेत इतर विद्यार्थ्यांना प्रवेश मिळावा, यासाठी वाढीव प्रवेश क्षमतेची मागणी करत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या नेतृत्वात विद्यार्थ्यांनी शिक्षण उपसंचालक कार्यालयात धडक दिली.

शिवसेनेचे विधानसभा समन्वयक प्रकाश मारोटकर यांच्या नेतृत्वात शेकडो विद्यार्थ्यांनी कार्यालयात धाव घेत निवेदन सादर केले. ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेमुळे फक्त ६० विद्यार्थ्यांनाच प्रवेश मिळत असल्याने उर्वरित शंभरहून अधिक विद्यार्थी प्रवेश वंचित राहिले आहेत. गेल्या महिन्याभरापासून हे विद्यार्थी महाविद्यालयाच्या चकरा मारत असून त्यांची व पालकांचीही चिंता वाढली आहे.विद्यार्थ्यांच्या मागणीवर शिक्षण उपसंचालकांनी शासनाची परवानगी घेऊन दोन दिवसांत प्रवेश क्षमतेत वाढ केली जाईल असे आश्वासन दिले.यावेळी शिवसेनेचे शुभम रावेकर, अक्षय हिवराळे, अमन मानकर, प्रेम हिवराळे, तसेच विद्यार्थ्यांमध्ये पियुष निमणेकर, रोहित वानखडे, सानवी देशमुख, आयुष धानोरकर, हिमांशू राजगुरे, दिव्या चव्हाण, शिवानी अलोणे, धनश्री ढोमणे, संस्कृती काळे, जयश्री पवार, दुर्गा सोनकुवर, रिया हूड, प्रियांका जाधव, तनवी बागोकर आदींचा सहभाग होता.

### मंत्र्यांचे कॉलेज सुरु ठेवण्यासाठीच ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया – शिवसेनेचा आरोप

शहरातील काही खासगी कॉलेजांना विद्यार्थी मिळत नसल्यामुळे ती बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. त्यातूनच मंत्री, आमदार, खासदार यांच्या कॉलेजांना वाचवण्यासाठीच ही ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया लादण्यात आली, असा आरोप प्रकाश मारोटकर यांनी केला.दोन दिवसांत वाढीव प्रवेश मान्यता न मिळाल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईलअसा इशाराही त्यांनी दिला.

# तिवसा शहरातील एस.टी. प्रवाशांचा दीर्घकालीन प्रश्न मार्गी लागणार

## अमित बाभुळकर यांची मंत्रालयात धाव

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६तिवसा:**– शहरातील नागरिक व प्रवाशांसाठी गेल्या अनेक वर्षांपासून डोकेदुखी ठरलेली महत्त्वपूर्ण समस्या म्हणजे अमरावती–नागपूर महामार्गावरील एसटी बस थांबत नसणे. परिणामी, तिवसामार्गे प्रवास करणाऱ्या नागरिकांना प्रवासासाठी प्रचंड अडचणींचा सामना करावा लागत होता. ही समस्या लक्षात घेऊन तिवसा येथील भाजपा माजी शहराध्यक्ष अमित बाभुळकर यांनी जिल्हा परिवहन महामंडळाकडे निवेदन सादर करून, तातडीने या प्रश्नाकडे लक्ष देण्याची मागणी केली. विशेष म्हणजे, यानंतर या समस्येच्या स्थायिक समाधानासाठी प्रतिनिधींनी थेट मुंबई मंत्रालय गाठले.महाराष्ट्र राज्याचे परिवहन मंत्री प्रतापराव सरनाईक यांचे खाजगी सचिव अनिकेत मनोरकर यांची मंत्रालयात भेट घेण्यात आली. यावेळी तिवसा बसस्थानक तसेच पंचवटी चौक येथे अमरावती –नागपूर आणि नागपूर–अमरावती मार्गावरील बस गाड्यांना नियमित थांबा देण्यात यावा, अशी ठोस मागणी करण्यात आली. मनोरकर यांनी याची गंभीर दखल घेत त्वरित संबधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या असून, लवकरच प्रवाशांना या मार्गावर थांबा लाभणार आहे.




# धारणीत ऐतिहासिक विक्रम : एकाच दिवशी २५०० आदिवासींना मिळाले जातीचे दाखले



**विदर्भ प्रजासत्ताक दि.६परतवाडा :** मेळघाट क्षेत्रातील धारणी तहसीलमध्ये एकाच दिवशी तब्बल अडीच हजार जात प्रमाणपत्रांचे वाटप सोमवारी झाले. धारणीचे प्रभारी उपविभागीय अधिकारी तथा तहसीलदार प्रदीप शेवाळे यांच्या पुढाकाराने हा उपक्रम राबविला गेला. राज्यात व जिल्ह्यात प्रशासनाच्या दृष्टीने तो विक्रमच ठरला आहे.अपर जिल्हाधिकारी गोविंद दानेज, आ. केवलराम काळे, पद्मश्री डॉ. रवींद्र कोल्हे, पद्मश्री डॉ. स्मिता कोल्हे, माजी आमदार पटल्या मावस्कर, ठाणेदार चव्हाण, डॉ. जावरकर व इतर मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. मेळघाटसारख्या आदिवासी भागात विविध दाखल्यांसाठी गोरगरीब आदिवासींना शासकीय कार्यालयाच्या पायऱ्या झिजवाव्या लागतात. अशात हा उपक्रम उल्लेखनीय असा ठरला आहे. त्यामुळे शासनदरबारी त्याची विशेष नोंद घेतली जावी, अशी मागणी आपण करणार असल्याचे आ. काळे यांनी स्पष्ट केले.पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निर्देशानुसार आणि विभागीय आयुक्त श्वेता सिंघल तसेच जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराच्या माध्यमातून हे प्रमाणपत्र वाटप केले.

गोरगरीब आदिवासींना महत्त्वपूर्ण व त्यांच्या पाल्याच्या शिक्षणासाठी जात प्रमाणपत्र आवश्यक आहे. त्यासाठी आवश्यक पुरावे व सर्व बाबी नपासून तब्बल अडीच हजार जात प्रमाणपत्रांचे वाटप यशस्वीरीत्या करण्यात आले. हा उपक्रम काही दिवसांत अजून मोठ्या प्रमाणात घेण्याचा मानस आहे. **–प्रदीप शेवाळे, प्रभारी उपविभागीयअधिकारी, धारणी.**

# अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघ केंद्रीय नियोजन समिती अध्यक्षपदी सुरेश सवळे यांची अविरोध निवड



**विदर्भ प्रजासत्ताक दि.६चांदूर बाजार** – शिरजगाव कसबा ब्रह्मांडनायक मध्ये अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाची केंद्रीय वार्षिक सभा संस्थापक केंद्रीय अध्यक्ष मनोहर सुने यांचे अध्यक्ष खाली पार पडली. पत्रकार संघाचे कार्यक्षेत्र संपूर्ण भारत असल्यामुळे संघाचे दरवर्षी वार्षिक धोरण ठरविणे. नवीन कार्यप्रणाली तयार करणे. केंद्रीय कार्यकारणीला दिशा निर्देश देण्याचे काम केंद्रीय नियोजन समिती करणार आहे. या महत्त्वपूर्ण केंद्रीय नियोजन समितीचे अध्यक्षपदी सुरेश सवळे यांची अविरोध निवड करण्यात आलेली आहे.केंद्रीय नियोजन समिती मध्ये ५ सदस्य राहणार आहे. या केंद्रीय कार्यकारणीच्या सभेला केंद्रीय कार्याध्यक्ष युसूफखान पठाण, केंद्रीय उपाध्यक्ष राजेंद्र भुरे ,प्रदीप जोशी, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष कैलास बापू देशमुख, केंद्रीय सरचिटणीस अशोक पवार ,केंद्रीय चिटणीस रवींद्र मेंढे, केंद्रीय कोषाध्यक्ष अशोक याऊल,केंद्रीय संपर्कप्रमुख अरुण कुलथे, केंद्रीय कार्यालय प्रमुख बाबाराव खडसे, केंद्रीय प्रसिद्धीप्रमुख सागर सवळे, केंद्रीय महिला संघटक सौ.जयश्री पंडागरे, केंद्रीय विधी सल्लागार किरण भुते, केंद्रीय सदस्य बाळासाहेब सोरगीवकर, मनोहर चरपे, अंबादास सिनकर उपस्थित होते.

# प्रभाग क्र. २२ मध्ये गाजर गवताचा विळखा

## स्वच्छतेकडे दुर्लक्ष, नागरिक संतप्त

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अमरावती–** बडनेरा रोडवरील नवीन वस्ती परिसरात (प्रभाग क्र. २२) सध्या नागरिक गाजर गवताच्या झपाट्याने वाढलेल्या विळख्यात सापडले असून, सार्वजनिक ठिकाणी तसेच नाल्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर गाजर गवत उगम पावले आहे. या परिसरातील अनेक नाले तुडुंब भरलेले असून, आरोग्यदायी वातावरणाचा संपूर्ण बोजवारा उडालेला आहे.स्वच्छता व्यवस्थेची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. नालेसफाईसाठी आवश्यक असलेली स्प्रे पंप फवारणी किंवा फॉगिंग मशीन यांचा सुद्धा वापर होताना दिसत नाही. मलेरिया, डेंग्यू यांसारख्या रोगांचा धोका वाढू लागल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

### नागरिकांच्या सहभागाची गरज

महापालिकेची ही जबाबदारी असली तरी, नागरिकांनीही आपला सहभाग देणे आवश्यक आहे. परिसरातील समस्या, अस्वच्छता याबाबत आयुक्तांकडे थेट तक्रारी कराव्यात, स्वच्छतेविषयी जागरूकता ठेवावी, असा संदेश स्वच्छता विभागातून दिला जात आहे.–

**नियमित सफाई यंत्रणा ठप्प**

पूर्वी आठवड्यातून एकदा प्रत्येक वस्तीमध्ये सफाई कर्मचारी येऊन दैनंदिन साफसफाई करत होते. मात्र, गेल्या काही महिन्यांपासून ही पद्धत पूर्णतः बंद झाल्याचे नागरिकांनी सांगितले.

विशेष म्हणजे, प्रत्येक प्रभागासाठी अमरावती महानगरपालिका दरमहा सुमारे नऊ लाख रुपये खर्च करते. हा निधी ठेकेदारांना दिला जातो, जो कररूपाने सामान्य जनतेकडून उभा केला जातो. मात्र, त्याच्या मोबदल्यात स्वच्छतेसारख्या मूलभूत सुविधा मिळत नसल्याने नागरिकांमध्ये संताप आहे.

**तक्रारींचे दुर्लक्ष, अधिकारी ढसाळ–**

आरोग्य विभागाकडे अनेक वेळा तक्रारी करण्यात आल्या. मात्र, आमच्यावर दबाव आहे, आम्ही काही करू शकत नाही असे उत्तर देत तक्रारींकडे दुर्लक्ष केले जाते. ही स्थिती बदलण्याची नागरिकांची मागणी असून, ठेकेदारांना जबाबदार धरून कारवाई व्हावी, अशी मागणी होत आहे.



**नव्या आयुक्तांच्या कार्यशैलीची आशा–** महानगरपालिकेत नुकतेच आयुक्त म्हणून रुजू झालेल्या सौ. सौम्या शर्मा मॅडम यांच्या कार्यशैलीमुळे काही प्रमाणात सफाईच्या कामात सुधारणा दिसून येत आहे. नागरिकांत आशेचा किरण निर्माण झाला असून, महापालिकेच्या स्वच्छता विभागाला नवा वेग मिळेल, अशी अपेक्षा आहे.

# विधानसभा आश्वासन समितीची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली

## अध्यक्ष आ. रवी राणा यांचे अधिकाऱ्यांना खडेबोल



**विदर्भ प्रजासत्ताकदि.६मुंबई,** विधान भवन, मुंबई येथे विधानसभा आश्वासन समितीची बैठक अध्यक्ष आमदार रवी राणा यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत महसूल आणि जलसंपदा विभागाच्या १०० हून अधिक आश्वासनांवर सखोल चर्चा झाली. २००५ ते २०२३ दरम्यान विधिमंडळात दिलेल्या आश्वासनांच्या पूर्ततेचा आढावा घेण्यात आला.

बैठकीस समिती सदस्य आमदार पराग शहा, राजेश पवार, अमित झनक, विक्रम पाचपुते यांच्यासह अनेक मान्यवर आमदार आणि विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.रवी राणा यांनी अधिकाऱ्यांना स्पष्ट शब्दांत सांगितले की, आश्वासने ही जनतेशी केलेली बांधिलकी आहे. त्याची पूर्तता करणे ही सचिव, जिल्हाधिकारी, आयुक्त आदींची जबाबदारी आहे. हयगय खपवून घेतली जाणार नाही.

**काही महत्त्वाचे मुद्दे:** जमिनींच्या तुकड्या विक्रीबाबत कारवाईचे आदेशबिल्डर जमिनीचे बेकायदेशीर तुकडे करून विक्री करत असून त्यामुळे गोरगरिबांना त्रास सहन करावा लागत आहे. या संदर्भात सर्व जिल्हाधिकाऱ्यांकडून अहवाल मागविण्यात आला आहे. सोफिया पॉवर प्रकरणाची चौकशीमूळ करार, वीज निर्मिती क्षमता, ताब्यात असलेल्या जमिनीचे तपशील, त्यातील उपयोग, वायू प्रदूषणामुळे शेतपिकांवर होणारे नुकसान आदींबाबत माहिती मागवून नुकसान भरपाई बाबत विचारणा. अपर वर्धा धरण विसर्गामुळे पीक हानीअतिपावसामुळे धरणातून पाण्याचा विसर्ग केल्याने शेतपिकांचे नुकसान झाले आहे. या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी, असे अध्यक्ष राणा यांनी जलसंपदा विभागास स्पष्ट आदेश दिले. नदीजोड प्रकल्पाबाबत आढावाअमरावती जिल्ह्यातील लोअर वर्धा, वडगाव दिपोरी, मोर्शी, मांजरी, म्हसला आदी गावांचा नदीजोड योजनेत समावेश असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. निम्न वर्धा धरण विसर्गामुळे नुकसानग्रस्त गावांना मदतरोहणा, दिघी, सायखेडा, धनोडी आदी गावांतील शेतकऱ्यांना आर्थिक मदतीचे निर्देश देण्यात आले.

या बैठकीस महसूल, जलसंपदा, वन आणि इतर विभागांचे सचिव, सहसचिव, उपसचिव, जिल्हाधिकारी, अपर जिल्हाधिकारी, एसडीओ, तहसीलदार यांच्यासह रिलायन्स कंपनीचे अधिकारी आणि विविध प्रकल्प अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी संजय बनसोडे , आमदार समीर मेघे, अनुप अग्रवाल, विनोद अग्रवाल, सचिन कल्याणशेट्टी, रमेश कराड, किशोर पाटील, प्रदीप जयस्वाल, किरण सामंत, हिरामन खोसकर, दौलत दरोडा, वरुण सरदेसाई, राजू खरे आदी सदस्यही उपस्थित होते.

# अमरावती जिल्ह्यातील मुगाचे पीक झाले हद्दपार

## मध्यप्रदेश मधील मुगाच्या शेंगा झाल्या दोनशे रुपये किलो

**विदर्भ प्रजासत्ताक**


**दि.६दर्यापूर–** एक काळ होता की मूग उडीद करडी हे आधी पीक नगदी पीक म्हणून समजले जायचे आणि एका दोन महिन्यांमध्ये मुगाच्या उडदाच्या शेंगा बाजारामध्ये कमी भावात मिळत होत्या मात्र आता उडीद मुग करडी आधी सर्व पिकं हद्दपार झाले असून आता मुगाच्या शेंगा मध्य प्रदेश मधून महाराष्ट्रातील अमरावती जिल्ह्यात आणल्या जातात व त्या बे भावात दर्यापूर मध्ये विकल्या जातात कधी २०० तर कधी दीडशे तर कधी १०० अशा भावाने त्या मुगाच्या शेंगा तेही एवढ्या काही खास नाही क***** वाळलेल्या सुकलेल्या तरीपण नवाई म्हणून घेणारे आज आपणास दिसतात मात्र तो



काही नोकरवर्ग अधिकारी वर्ग यामध्ये प्रामुख्याने जास्त करून दिसतो रस्त्यावर मुगाच्या शेंगा विकणारा मराठी माणूस मध्य प्रदेश मधील शेंगा विकताना त्याचं मन तुटतंय पण महाराष्ट्रातील काय अमरावती जिल्ह्यातील किंवा दर्यापूर तालुक्यातील शेतीमध्ये पिकाच नाही त्यामुळे त्याला नाईलाजाने मध्ये मध्य प्रदेशातील शेंगा विकाव्या लागतात असे मत सामाजिक कार्यकर्ते फ्रेंड्स एकता ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संदीप पाटील अरबट यांनी व्यक्त केले तसेच मुगाच्या शेंगांचा भाव ऐकल्यावर मोपारी पाटील गुरुजी यांना नवलच वाटले तरी पण त्यांना अर्धा किलो शेंगा घ्यायचा मोह आवरला नाही.

# गझल हेच व्रत हाच ध्यास !!

## भीमराव पांचाळे यांना गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार प्रदान



महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कारांचा हीरक महोत्सवी सोहळा मंगळवार, ५ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी ६:३० वाजता वरळी येथील एनएससीआय डोम येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी ६० आणि ६१ वे महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कार प्रदान करण्यात आले. त्याचबरोबर नामांकित राज कपूर कपूर, व्ही शांताराम, जीवनगौरव आणि विशेष योगदान पुरस्कारही यावेळी प्रदान केले गेले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार, पालकमंत्री मंगलप्रभात लोढा यावेळी उपस्थित होते. यावेळी प्रख्यात गझल सम्राट भीमराव पांचाळे यांना गानसाम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले

# गुन्हे शाखेची कारवाई : अमरावतीत डिझेल साठवणूक व घरगुती गॅस रिफीलींग करणाऱ्या दोघांवर कारवाई



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अमरावती –** गुन्हे शाखा, युनिट क्र.०१, अमरावती शहर यांच्या पथकाने पोलीस स्टेशन नागपूरीगेट हद्दीत दोन ठिकाणी छापे टाकून अवैधरित्या ज्वलनशील पदार्थांची साठवणूक करणाऱ्या आणि घरगुती गॅस सिलेंडरमधून वाहनात गॅस रिफीलींग करणाऱ्या दोन इसमांवर कारवाई केली.

पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली.पहिली कारवाई गुलिस्ता नगर येथील अब्दुल सलाम अब्दुल सत्तार (वय ४०) यांच्या घराच्या कंपाउंडमध्ये करण्यात आली. पंचासमक्ष घेतलेल्या धाडीत १५ प्लॅस्टिक डबक्यांमध्ये साठवलेले अंदाजे ७९५ लिटर डिझेल सदृश्य तरल पदार्थ मिळून आले. सदर मुद्देमालाची एकूण किंमत ७९,६४५/– इतकी आहे.

दुसरी कारवाई मुज्जफरपूरा येथील हैदरपुरा ईदगाहसमोर करण्यात आली. आरोपी अन्वर बेग रहीम बेग (वय ४४) यास पोलीसांनी ऑटो (क्रमांक MH27-BW-8346) मध्ये अवैधरित्या घरगुती गॅस सिलेंडरमधून इलेक्ट्रिक मशीनच्या साहाय्याने गॅस रिफीलींग करताना रंगेहाथ पकडले. त्याच्याकडून ११ भारत गॅस कंपनीचे सिलेंडर, १ इलेक्ट्रिक मशीन, १ वजन काटा व प्रवासी ऑटो असा एकूण १,३८,०००/– किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.दोन्ही आरोपींना पोलीस स्टेशन नागपूरीगेटच्या ताब्यात देऊन पुढील तपास सुरू आहे.

### कारवाईत सहभागी अधिकारी व कर्मचारी

पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव, सपोनि मनीष वाकोडे, इम्रान नाईकवडे, अशोक वाटाने, युसूफ सौदागर, फिरोज खान, सतीष देशमुख, मंगेश लोखंडे, सचिन बहाळे, प्रशांत मोहोड, नाझीमउद्दीन सैयद, विकास गुढघे, सचिन भोयर, सुरज चव्हाण, निखील गेडाम, रंजित गावंडे, रुपेश काळे, नरेश मोहरिल, चालक अलिमोद्दीन खतिब, चालक किशोर खेंगरे व अशोक खंगार (सर्वजण युनिट क्र.०१, गुन्हे शाखा).

# उद्याला अमरावतीत मूक मोर्चा

## पंचायत अधिकाऱ्यांचा शांततेच्या मार्गाने निषेध

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अमरावती –** महाराष्ट्र राज्यातील ग्रामपंचायत अधिकारी हे ग्रामीण विकास विभागामार्फत अत्यंत प्रभावीपणे कार्य करत असून, त्यांची कामगिरी राज्य व केंद्र सरकारच्या पातळीवर गौरवली जात आहे. मात्र, दिनांक २ ऑगस्ट २०२५ रोजी जिल्ह्यातील जि.प. जिंतूर तालुक्यातील परंपरा पाटदार आवास योजनेच्या कार्यक्रमात ग्रामविकासमंत्री मा. ना. गिरीश महाजन यांनी ग्रामपंचायत अधिकाऱ्यांविषयी सार्वजनिक कार्यक्रमात अवमानकारक भाषा



वापरून मनोबल खच्चीकरण केले, असा आरोप करण्यात आला आहे.या निषेधार्थ चादुर रेल्वे येथिल ग्रामपंचायतसर्व ग्रामपंचायत अधिकारी यांना सूचित करण्यात येते की उद्या दिनांक ४ ८ २०२५ रोजी सकाळी ग्रामपंचायतीला जाताना काळ्या फिती लावून जावे.जेणेकरून आंदोलन १०० टक्के यशस्वी होईल. दिनांक ७ ८ २०२५ रोजी गुरुवार ला सकाळी ११ वाजता जिल्हा परिषद कार्यालयासमोर मुक मोर्चा करिता जिल्हय़ातील सर्व ग्रामपंचायत अधिकारी बंधू भगिनी सर्वांनी हजर राहावे.

# चिचखेडा येथे दोन घरांवर धाड; वनगुन्हा दाखल

## ७६ हजारांचे सागवान लाकूड जप्त

**विदर्भ प्रजासत्ताकदि.६चिखलदरा :** मेळघाट वन्यजीव विभागपरतवाडाअंतर्गत जामली परिक्षेत्रातील चिचखेडा (ता. चिखलदरा) गावात गोपनीय माहितीच्या आधारे टाकलेल्या धाडीत ७६ हजार रुपयांचे ०.८३५ घनमीटर लाकूड जप्त करण्यात आले. ४ ऑगस्ट रोजी ही कारवाई करण्यात आली.सूत्रांनुसार, शिवराज अशोक अजनेरीया (३६) आणि रवि किसन कोगे (४०, दोघेही रा.चिचखेडा) यांच्या घरी ४ ऑगस्ट रोजी सकाळी गोपनीय माहितीच्या आधारे धाड टाकण्यात आली. दोन्ही घरांतून ७६ हजार रुपयेकिमतीचे सागवान लाकूड जप्त करण्यात आले, तसेच सुतारकामासाठी वापरलेली अवजारे घटनास्थळी आढळून आले. भारतीय वन अधिनियम १९२७ अंतर्गत दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक (मेळघाट व्याघ्र प्रकल्प,



अमरावती) आदर्श रेड्डी, विभागीय वन अधिकारी (मेळघाट वन्यजीव विभाग, परतवाडा) वैभव घार्गे, एसीएफ राजेश रत्नपारखी यांच्या मार्गदर्शनात आणि आरएफओ (जामली) अर्चना अलोकार यांच्या नेतृत्वात वाइल्ड लाइफ सायबरसेलमधील दिनेश केंद्रे, अनंता नायसे, स्वप्निल राऊत, विशाल उमाळे, विशाल सुरत्ने, तसेच जामली वन्यजीव परिक्षेत्र, गाविलगड वन्यजीव परिक्षेत्र, घटांग वन्यजीव परिक्षेत्रातील अधिकारी–कर्मचारी यांनी कारवाई केली.

# साफसफाई व अतिक्रमण विरोधी मोहिमेचा आढावाआयुक्त सौम्या शर्मा चांडक यांची बेलपुरा रोड, कंवर नगर, अंबिका नगर व राजापेठ परिसरात पाहणी



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अमरावती–** अमरावती महानगरपालिकेच्या आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी सकाळी ७.३० वाजता बेलपुरा रोड, कंवर नगर, अंबिका नगर व राजापेठ या परिसरात स्वच्छता व अतिक्रमण संदर्भातील परिस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेतला.पाहणी दरम्यान आयुक्तांनी संबंधित विभाग प्रमुखांना स्वच्छता बाबत अधिक दक्षता घेण्याचे निर्देश दिले. तसेच, अनधिकृत अतिक्रमण झोनमध्ये येणाऱ्या ठिकाणी तातडीने कारवाई करण्याचे आदेशही त्यांनी दिले. नागरिकांना स्वच्छता राखण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन करत, सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकल्यास दंडात्मक कारवाई केली जाईल असेही त्यांनी सांगितले.महानगरपालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाने काही ठिकाणी अनधिकृत टपऱ्या व बांधकामांचे सर्वेक्षण सुरू केले असून, येत्या काही दिवसांत नियोजित कारवाई करण्यात येणार आहे.ही पाहणी मोहीम महानगरातील नागरी सुविधा, स्वच्छता व वाहतुकीचा सुलभ प्रवाह सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरत आहे. यावेळी आयुक्तांनी परिसरातील नागरिकांशी संवाद साधुन त्यांच्या समस्या जाणून घेतल्या व सदर परिसरातील नागरिकांच्या समस्यांचे निराकरण करण्याचे निर्देश यावेळी आयुक्तांनी दिले.आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी निर्देश दिले की, स्वच्छता व्यवस्था सुधारण्यासाठी तात्काळ उपाययोजना कराव्यात. नियमित साफसफाई सुनिश्चित करावी. कचरा उचलण्यासाठी पुरेशा संख्येने वाहनांची आणि कर्मचाऱ्यांची नेमणूक करावी. अनधिकृत अतिक्रमणांवर कठोर कारवाई करा. मुख्य रस्ते व सार्वजनिक स्थळांवरील अतिक्रमण हटवण्यासाठी विशेष मोहीम राबवावी. अतिक्रमण करणा–यांना पूर्वसूचना देऊन नंतर तातडीने कारवाई करावी. नागरिकांना जनजागृतीद्वारे सहभागी करून घ्या. स्वच्छतेबाबत जनजागृती मोहिमा चालवा. स्थानिक रहिवाशांना अडचणी असल्यास त्यांची माहिती घेऊन तत्काळ उपाय सुचवावेत. दंडात्मक कारवाईला गती द्या. सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणाऱ्यांवर दंड लावण्यात यावा. नियमित गस्तीद्वारे उल्लंघन करणाऱ्यांवर नियंत्रण ठेवा. प्रत्येक विभागाने जबाबदारीने काम करावे. संबंधित क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी यांना त्यांच्या कामगिरीसाठी उत्तरदायी धरण्यात येईल. कामात हलगर्जीपणा आढळल्यास कारवाई केली जाईल. यावेळी भुयारी गटारीचे योग्य नियोजन करण्याचे निर्देशही महाराष्ट्र जिवन प्राधिकरण यांना देण्यात आले. सदर परिसरातील नालीचे बांधकामांबाबत व नाल्यांचे नियमित देखरेख करण्याचे निर्देश यावेळी अभियंत्यांना देण्यात आले.आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी नागरिकांना आवाहन केले की, अमरावती शहर हे स्वच्छ, सुंदर आणि अतिक्रमणमुक्त व्हावे, यासाठी महानगरपालिका प्रशासन सातत्याने प्रयत्नशील आहे. मात्र, या कार्यात प्रशासनाबरोबरच प्रत्येक नागरिकाचीही सक्रिय भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. आपापल्या परिसरात स्वच्छता राखावी, कचरा निर्धारित ठिकाणीच टाकावा आणि अनधिकृत बांधकाम किंवा अतिक्रमण टाळावे. सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण हे आपले सामूहिक कर्तव्य आहे. जर आपल्या परिसरात कुठे अतिक्रमण, घाणीची स्थिती किंवा महापालिकेच्या सेवांबाबत अडचणी असतील, तर महापालिकेशी त्वरित संपर्क साधावा. 'स्वच्छ अमरावती, सुंदर अमरावती' हे स्वप्न साकार करण्यासाठी आपला सक्रिय सहभाग अत्यावश्यक आहे. या पाहणी दरम्यान वैद्यकीय अधिकारी डॉ.अजय जाधव, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, जेष्ठ स्वास्थ निरीक्षक विजय बुरे, स्वास्थ निरीक्षक, मनपा कर्मचारी उपस्थित होते.

# नवीन कायद्याद्वारे नागरिकांना जलद व सुलभ न्याय प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सुधाकर यार्लगड्डा

## नव्या भारताचे नवे कायदे, भारतीय न्याय संहिता २०२३ मल्टिमीडिया छायाचित्र प्रदर्शनाचे उद्घाटन



**विदर्भ प्रजसत्ताक**
**दि.६अमरावती**

नागरिकांना जलद व सुलभ न्याय मिळण्याकरिता भारत सरकारने लागू केलेल्या नवीन कायदेविषयक माहिती जाणून घेण्यासाठी नागरिकांनी प्रदर्शनाला आवर्जून भेट द्यावी, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सुधाकर यार्लगड्डा यांनी आज येथे केले.माहिती व प्रसारण मंत्रालय, भारत सरकारच्या केंद्रीय संचार ब्युरो, क्षेत्रीय कार्यालय, अमरावती, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अमरावती, जिल्हा प्रशासन, अमरावती, जिल्हा परिषद, अमरावती, पोलिस आयुक्त कार्यालय, अमरावती, पोलिस अधीक्षक कार्यालय, अमरावती, जिल्हा माहिती कार्यालय, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा व सत्र न्यायालय, अमरावती येथे आयोजित केलेल्या नव्या भारताचे नवे कायदे, भारतीय न्यायसंहिता २०२३ या विषयावरील मल्टिमीडिया छायाचित्र प्रदर्शनाचे उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.मंचावर पोलिस अधीक्षक विशाल आनंद, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्रा, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव डी. एस. वमने, माहिती व प्रसारण मंत्रालय भारत सरकारच्या केंद्रीय संचार ब्युरोचे क्षेत्रीय प्रचार अधिकारी हंसराज राऊत, जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष सुनिल देशमुख प्रामुख्याने उपस्थित होते.प्रमुख न्यायाधीश सुधाकर यार्लगड्डा पुढे बोलतांना म्हणाले की, भारत सरकारच्या केंद्रीय संचार ब्यूरोने हा खूप चांगला उपक्रम राबविला आहे. नवीन कायद्यात माहिती तंत्रज्ञानाचा वापर करण्याची तरतुद करण्यात आल्यामुळे साक्षीदार फितूर होण्याचे प्रकार टाळल्या जातील आणि गुन्हेगारांना शिक्षा होण्याचे प्रमाण वाढेल. जुन्या कालबाह्य क्लिष्ट कायद्यातील तरतुदी नवीन कायद्यामुळे सोप्या झाल्या आहेत. या नवीन कायद्यांमध्ये नागरिकांना जलद व सुलभ न्याय मिळण्याकरिता तरतूद करण्यात आली आहे. नागरीकांनी या प्रदर्शनाला आवर्जुन भेट देऊन नवीन कायदेविषयक माहिती जाणून घ्यावी, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.पोलीस अधिक्षक विशाल आनंद म्हणाले, पुर्वीचे कायदे ब्रिटीशांनी तयार केले होते. काळानुसार त्यात बदल होणे आवश्यक होते. कालबाह्य कायदे नष्ट करून तो बदल या नवीन कायद्यात करण्यात आला आहे. या नवीन कायद्यामुळे येणाऱ्या काळात नागरीकांसाठी न्याय मिळविणे, अत्यंत सोपे होणार आहे. त्यामुळे जास्तीत जास्त नागरीक व विद्यार्थ्यांनी प्रदर्शनाला भेट देऊन नवीन कायद्याची माहिती जाणून घ्यावी, असे आवाहन त्यांनी यावेळी व्यक्त केले.पोलिस उपायुक्त गणेश शिंदे म्हणाले, या नवीन कायद्यात नवीन तंत्रज्ञानाचा समावेश झाल्यामुळे तपासाच्या दृष्टीने पोलीसांना मदत होणार आहे. हा कायदा तपास प्रक्रियेसाठी अत्यंत प्रभावी असल्याचे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.सुनील देशमुख म्हणाले, ब्रिटिशकालीन कालबाह्य कायद्यांमध्ये सुधारणा करून भारत सरकारने नवीन कायदे अमलात आणले आहेत. या नवीन कायद्यात खऱ्या गुन्हेगारांना निश्चितपणे शिक्षा होणार आहे. बऱ्याच कायद्यात बदल झाला असल्यामुळे पोलिस विभागाने नवीन कायद्याचा अभ्यास करून त्यादृष्टिकोणातून तपास केल्यास निश्चित फायदा होईल, असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.प्रास्ताविक भाषणात क्षेत्रीय प्रचार अधिकारी हंसराज राऊत म्हणाले की, नागरीकांना नवीन कायद्याची माहिती करून देण्याकरिता माहिती व प्रसारण मंत्रालय, भारत सरकारच्या केंद्रीय संचार ब्युरो क्षेत्रीय कार्यालय अमरावती मार्फत दोन दिवसीय मल्टीमीडिया छायाचित्र प्रदर्शन हा उपक्रम राबविला आहे. या प्रदर्शनात नवीन कायदे तसेच बदलण्यात आलेल्या जुन्या कायद्यातील सुधारित नवीन कायदे याबाबत सविस्तर मांडणी करण्यात आली आहे. नागरिकांना मिळणाऱ्या कायदेविषयक सल्ला तसेच सुविधांविषयी माहिती देण्यात आली आहे. हे प्रदर्शन ७ ऑगस्ट २०२५ पर्यंत सकाळी १० ते सायंकाळी ५ यावेळेत नागरिकांसाठी निःशुल्क खुले ठेवण्यात आले आहे. त्यामुळे नागरिकांनी या प्रदर्शनाला आवर्जून भेट देऊन कायदेविषयक माहिती जाणून घ्यावी, असे आवाहन क्षेत्रीय प्रचार अधिकारी हंसराज राऊत यांनी केले.संचालन ज्येष्ठ पत्रकार संजय पाखोडे यांनी केले, तर आभार जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव डी. एस. वमने यांनी मानले.यावेळी कौटुंबिक न्यायालयाचे प्रमुख न्यायाधीश श्री. शेळके, जिल्हा न्यायाधीश श्री. वाघमारे, जिल्हा न्यायाधीश श्री. गोस्वामी, जिल्हा न्यायाधीश श्री. शर्मा, जिल्हा न्यायाधीश श्री. शिंदे, वरिष्ठ स्तर न्यायाधीश श्री. रामटेके, मुख्य न्यायदंडाधिकारी श्री. भट्टाचार्य, रायसोनी विद्यालयाच्या डीन मीना नाथ, पंजाबराव देशमुख लॉ कॉलेजचे प्राध्यापक श्री. रामटेके, संदीप वानखेडे प्रमुखपणे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी केंद्रीय संचार ब्युरो क्षेत्रीय कार्यालय अमरावतीचे क्षेत्रीय प्रचार सहाय्यक शशिकांत पटेल, एमटीएस सागर लाडोले, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अधिक्षक शालीनी मोटे, कर्मचारी सर्वश्री श्री. शेळके, श्री. बनसोड, श्रीमती पाटील, श्रीमती अंजीकर, श्री. खांडेकर, श्री. गजभिये, श्री. शिरभाते, मिलींद लव्हाळे, योगेश इंगोले, श्री. मोईज, कु. दीक्षा यांच्यासह ड. श्री. देशमुख, सहायक खान, शेख, झंळे, श्रीमती ठाकरे व विधी सेवा न्यायरक्षक, अभियोक्त यांनी परिश्रम घेतले.

# १५ व्या वित्त आयोगाची रक्कम ग्रामपंचायतींना देताना भेदभाव

## जि. प.कडून पाठपुरावा तरीही सरकारकडून प्रतिसाद मिळेना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

जिल्ह्यातील ग्रामपंचायतींना दर पाच वर्षांनी वित्त आयोगाचा निधी दिला जातो. या रकमेतून गावातील लोकोपयोगी विकासकामे केली जातात. परंतु केंद्र शासनाने ही रक्कम देताना भेदभाव केल्याचे वास्तव पुढे आले. ८४१ पैकी ३१४ ग्रा. पं.ना अद्याप पंधराव्या वित्त आयोगाची रक्कम मिळाली नाही. त्यामुळे त्या ठिकाणची विकासकामे रखडली आहेत.

लोकसंख्या आणि गरजेची कामे यानुसार संबंधित ग्रा. पं.ला किती रक्कम द्यावी, हे ठरवले जाते. यासंदर्भात राष्ट्रीय प्रधान मुखिया सरपंच संघटनेचे प्रतिनिधी मंडळ १७, १८ ऑगस्टला केंद्रीय ग्रामविकास मंत्र्यांची दिल्लीत भेट घेणार आहे. संघटनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष राहुल उके व जिल्ह्यातील इतर पदाधिकाऱ्यांनी त्यासाठी पुढाकार घेतला आहे. अनेक महिन्यांपासून हा निधी अडकला असल्याने गावांतील विकासकामेही थांबली आहेत. आतापर्यंत या वित्त आयोगाच्या माध्यमातून जिल्हाला ८१ कोटी ६४ लाख २६ हजार पंधराव्या वित्त आयोगाचा रखडलेला निधी तातडीने मिळावा, यासाठी १७, १८ ऑगस्टला सरपंच संघटनेचे प्रतिनिधी मंडळ दिल्लीला जाणार आहे. निधीअभावी गावांचा विकास ठप्प झाला आहे. त्यासाठी केंद्रीय ग्रामविकास मंत्र्यांना भेटून त्यांच्या समोर हा मुद्दा मांडणार आहे. –प्रमोद सांगोले, प्रदेशाध्यक्ष, राष्ट्रीय प्रधान मुखिया सरपंच संघ. रुपयांची रक्कम



शासन त्यांच्याकडे उपलब्ध निधीनुसार देशभरातील ग्रामपंचायतींना वित्त आयोगाची रक्कम पाठवित असते. जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींना बंधित व अबंधितचा पहिला हप्ता मिळाला आहे. काही ग्रामपंचायतींनी त्या रकमेची उपयोगिता प्रमाणपत्रे आणि ऑडिट रिपोर्ट देण्यात विलंब केला. त्यामुळे त्यांची मागणीही उशिराने नोंदवावी लागली. दरम्यान येत्या काळात त्यांनाही त्यांच्या वाट्याचा निधी मिळेल, अशा सूचना प्राप्त झाल्या आहेत.



**संजीता महापात्र**
**सीईओ, जि. प.**

दोन टप्प्यात मिळाली. मात्र ३१४ ग्रा. पं.ची उर्वरित रक्कम केव्हा मिळेल, याबद्दल शासन बोलायला तयार नाही. त्यामुळेच निधी वितरणात शासनाने भेदभाव केला, असा आरोप संघटनेने केला आहे.

# अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील मोकाट श्वान व जनावरांवरील नियंत्रणासाठी महत्त्वपूर्ण बैठक

## उपाययोजना अधिक प्रभावी करण्यावर भर



**विदर्भ प्रजसत्ताक**
**दि.६अमरावती**

अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या अध्यक्षतेखाली आज दिनांक ५ ऑगस्ट रोजी एक महत्त्वपूर्ण बैठक घेण्यात आली. श्वान उत्पत्ती नियंत्रण उपक्रम २००१ व प्राणी जन्म नियंत्रण नियम २०२३, तसेच नागरी क्षेत्रात गुरे पाळणे अधिनियम अंतर्गत अमरावती शहरात वाढत चाललेल्या मोकाट श्वान आणि जनावरांमुळे निर्माण होणाऱ्या समस्यांवर उपाययोजना करण्यासाठी ही बैठक आयोजित करण्यात आली होती.

शहरात लहान मुलांवर होणाऱ्या श्वान दंशाच्या घटना घडत असून दररोज तक्रारी महानगरपालिकेकडे प्राप्त होत असून, या पार्श्वभूमीवर उपाययोजना करण्याची गरज अधोरेखित करण्यात आली.

आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी सर्व संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने आणि परिणामकारक अंमलबजावणी करण्याचे स्पष्ट निर्देश दिले.

अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी आजच्या बैठकीत श्वान व मोकाट जनावरांमुळे निर्माण होणाऱ्या समस्यांवर तातडीने आणि प्रभावी उपाययोजना राबविण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट व ठोस निर्देश दिले की, श्वान उत्पत्ती नियंत्रण उपक्रम (ABC) त्वरीत सुरू करावा, यासाठी निविदा प्रक्रिया तातडीने पूर्ण करून निवड करण्यात आलेल्या संस्थेला काम सुरू करण्यास सांगावे. मोकाट व रेबिजग्रस्त श्वानांविरोधात ठोस कारवाई करावी, अशा प्रकरणांमध्ये नागरिकांच्या तक्रारींवर तत्काळ प्रतिसाद द्यावा. मोकाट श्वानांचे लसीकरण शिबिरांची आखणी करून मोहीम स्वरूपात राबवावी, विशेषतः शाळा, उद्याने, वसाहती या ठिकाणी विशेष लक्ष द्यावे. दररोज प्राप्त होणाऱ्या श्वान दंश व मोकाट जनावरांच्या तक्रारींचे विश्लेषण करून विभागीय जबाबदारी निश्चित करावी व संबंधित अधिकाऱ्यांची कार्यक्षमतेनुसार चौकशी करावी. प्राणी जन्म नियंत्रण नियम २०२३ अंतर्गत नव्या तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी करावी, व नागरिकांना जनजागृतीसाठी विशेष मोहिमा राबवाव्यात. गुरे पाळण्यासाठी परवाने घेणे सक्तीचे करावे, आणि परवान्याशिवाय गुरे पाळणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात यावी. मोकाट जनावरांवर कारवाई करताना पोलीस संरक्षण घेण्याचे नियोजन करावे, विशेषतः गर्दीच्या व रहदारीच्या भागात कार्यवाही करताना वाहतूक पोलिसांचा समन्वय ठेवावा. पाळीव व मोकाट जनावरांचे टॅगींग करणे बंधनकारक करावे, यासाठी स्वतंत्र अभियान हाती घ्यावे.

आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी स्पष्टपणे सांगितले की, नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न अत्यंत संवेदनशील आहे. जनावरांमुळे होणारे अपघात, दंश व अडथळ्यांवर प्रभावी नियंत्रण मिळवणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे. या संदर्भात कोणतीही कसूर खपवून घेतली जाणार नाही.

अमरावती महानगरपालिकेच्या वतीने नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की, मोकाट श्वान व जनावरांबाबत कोणतीही समस्या असल्यास त्वरित महानगरपालिकेशी संपर्क साधावा, तसेच कायद्याचे पालन करून सहकार्य करावे.

या बैठकीत उपायुक्त डॉ.मेघना वासनकर, पशुशल्य चिकीत्सक डॉ.सचिन बोंद्रे, संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

सदर बैठकीमध्ये प्राणी क्लेश प्रतिबंधक समिती तथा प्राणी जन्म कल्याण समिती, सदस्य डॉक्टर संजय कावरे, उपायुक्त पशुसंवर्धन, डॉक्टर पुरुषोत्तम सोळंके, डॉक्टर राधेश्याम बहादुरे, तथा अशासकीय सदस्य विजय शर्मा, शुभम सायके,सागर मैदान कर जिल्हा दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते सर्व शासकीय अधिकारी यांना आपल्या कार्यक्षेत्रानुसार कारवाई करण्याकरिता माननीय आयुक्त यांनी आदेशित केले.

# विद्यापीठा नजीक होणार डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे (बार्टी) चे अमरावती उपकेंद्र

## आ.सौ.सुलभाताई खोडके यांच्या सातत्यपुर्ण प्रयत्नांची फलश्रुती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाच्या अधिनस्त असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे या स्वायत्त संस्थेचे अमरावती येथे लवकरच उपकेंद्र स्थापन होणार आहे. या संदर्भात आ.सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी शासनाकडे सातत्यपूर्ण प्रयत्न केल्याने आता शासनाने अमरावती येथे बार्टीचे विभागीय केंद्र सुरु करण्याच्या दिशेने कार्यवाही सुरु केली आहे. तसेच बार्टी अंतर्गत एनईईटी व जेईई परीक्षेसाठी सुद्धा लवकरच मोफत प्रशिक्षणाची सुविधा मिळणार आहे. याबद्दल आ. सौ.




सुलभाताई खोडके यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार, सामाजिक न्याय मंत्री – संजय सिरसाठ तसेच महायुती सरकारचे आभार मानीत अभिनंदन केले आहे.

अनुसूचित जाती आणि नवबौद्ध घटकांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक विकासाबरोबरच या घटकांसाठी संशोधन, प्रशिक्षण आणि राज्य शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे ही स्वायत्त संस्था कार्यरत आहे. या अंतर्गत स्पर्धा परीक्षांसाठी मोफत निवासी प्रशिक्षण,अनुसूचित जाती आणि नवबौद्ध विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना, सामाजिक न्याय आणि सबलीकरणासाठी संशोधन प्रकल्प, जागरूकता आणि क्षमता बांधणी कार्यक्रम, विविध सामाजिक समस्यांवर जनजागृती देखील बार्टी मार्फत करण्यात येते.

बार्टीचे मुख्य कार्यालय पुणे येथे असल्याने अमरावती विभागातील अनुसूचित जाती आणि नवबौद्ध घटकांना विविध संशोधन व प्रशिक्षणाकरिता पुणे येथे निवासी व्यवस्था करण्यात येते. त्यामुळे बार्टीचे विभागीय केंद्र अमरावती येथे सुरु करण्यासंदर्भात आ. सौ. सुलभाताई खोडके यांचा मागील कार्यकाळापासून पाठपुरावा सुरु होता. तसेच अमरावती विधानसभा निवडणुकपूर्व काळातही दिलेल्या वचननाम्यामध्ये अमरावती येथे बार्टीचे विभागीय केंद्र स्थापन करण्यासंदर्भात सुद्धा आश्वासित करण्यात आले होते. दरम्यान बार्टीच्या अमरावती विभागीय केंद्राकरिता विद्यापीठा नजीक मार्डी रोडवर जागा देखील निवडण्यात आली व त्याला वॉल कंपाऊंड सुद्धा घातल्यात आले होते. परंतु प्रत्यक्षात बार्टीचे अमरावती विभागीय केंद्र सुरु करण्यास कार्यवाही झाली नसल्याने आमदार सौ.सुलभाताई खोडके यांनी राज्याचे उपममुख्यमंत्री ना. अजितदादा पवार व सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडे पाठपुरावा सुरु केला. मार्च २०२५ च्या अर्थसंकल्पात ना. अजितदादा पवार यांनी सामाजिक न्याय विभागाच्या विविध कल्याणकारी योजनांसाठी भरीव निधीची तरतूद केली. अशातच आता शासनाच्या सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे या स्वायत्त संस्थेचे अमरावती येथे उपकेंद्र स्थापन करण्यासंदर्भात कार्यवाही सुरु केली आहे.

# टाकाऊपासून टिकाऊ उपक्रम : विद्यार्थिनींच्या कुशाग्रतेतून फुललेल्या आकर्षक कुंड्या

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६तळेगाव ठाकूर**

जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक कन्या शाळा, तळेगाव ठाकूर येथील विद्यार्थिनींनी पर्यावरणपूरक आणि सर्जनशीलतेने भरलेला 'टाकाऊपासून टिकाऊ' उपक्रम राबवत समाजासमोर एक प्रेरणादायी उदाहरण ठेवले आहे. रिकाम्या तेलाच्या कॅनपासून आकर्षक कुंड्या तयार करून त्या शाळेच्या आवारात फुलझाडांनी सजवण्यात आल्या आहेत.



या उपक्रमाअंतर्गत विद्यार्थिनींनी वापरात न आलेले तेलाचे कॅन वेगवेगळ्या आकारांत कापले, त्यांना सुंदर रंगसंगतीने सजवले आणि कुंडीचे स्वरूप दिले. यामध्ये विविध प्रकारच्या फुलझाडांची लागवड करण्यात आली आहे. या कुंड्या शाळेच्या खांबांना बांधण्यात आल्या असून संपूर्ण शाळा आणि खांबही सुशोभित झाले आहेत. शाळेचा परिसर फुलांनी बहरलेला दिसत असून प्रत्येक कोपर्यात सौंदर्य व स्वच्छतेचा संगम अनुभवास येत आहे.

या नाविन्यपूर्ण उपक्रमाचे यश शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. वर्षा कावळे मॅडम यांचे प्रेरणादायी मार्गदर्शन, सर्व शिक्षकवृंदांची सहकार्य भावना तसेच युवा प्रशिक्षणार्थी कल्याणी ठाकूर यांच्या सहकार्यास दिले जाते. विद्यार्थिनींनी यासाठी परिश्रमपूर्वक काम करून एक सामाजिक संदेशही दिला आहे की, टाकाऊ वस्तूंमधूनही सौंदर्य निर्माण करता येते आणि पर्यावरण रक्षणात योगदान देता येते.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, श्रमप्रतिष्ठा आणि पर्यावरण संवर्धनाची भावना वृद्धिंगत झाली आहे. स्थानिक ग्रामस्थ व पालकवर्गांनीही या अभिनव उपक्रमाचे कौतुक केले असून शाळेचा हा प्रयोग इतर शाळांसाठीही प्रेरणादायी ठरत आहे.

# धारणी उपकेंद्राला भेट,वीज पुरवठ्याचा घेतला आढावा ग्राहक संवाद आणि स्वच्छता मोहिम राबविण्याचे निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

महावितरणचे मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी धारणी उपविभागाला भेट देऊन उपविभागातील वीज वितरण व्यवस्थेचा आढावा घेतला. वारंवार खंडित होणाऱ्या वीज पुरवठ्याच्या समस्यांचा तपास करून त्या वेळेत दूर करण्याचे स्पष्ट निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले.यावेळी कार्यकारी अभियंता प्रदिप अंधारे , उपकार्यकारी अभियंता श्याम एनगंटीवार आणि धारणी उपविभागातील कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

यावेळी मुख्य अभियंता यांनी ३३ केव्ही धारणी उपकेंद्रांची पाहणी करून अखंडित व सुरळीत वीज पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी वेळोवेळी आवश्यक दुरुस्त्या व देखभाल कामे करण्यास सांगितले.नंतर धारणीतील थेट ग्राहकांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. वीज ग्राहकांना महावितरण कार्यालयाच्या चकरा मारायला लागू नयेत, ही आपली प्राथमिक जबाबदारी समजून



महावितरण सेवा ग्राहकाभिमूख करून स्वत:ची वेगळी ओळख निर्माण करा.तसेच ग्राहकांनी वेळेवर वीजबिल भरले पाहिजे अशी संस्कृती निर्माण करण्याचे निर्देश दिले.दरम्यान, गाडगेमहाराज स्वच्छता अभियानाअंतर्गत धारणी उपविभागीय कार्यालय परिसरात स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. परिमंडळ कार्यालयाकडून कार्यालयाच्या पत्रानूसार प्रत्येक कार्यालय प्रमुखाने आपले कार्यालय आणि परिसराची नियमित स्वच्छता ठेवावी, असेही मुख्य अभियंत्यांनी आवाहन केले.

# खूशखबर... नागपूर-पुणे वंदे भारत एक्स्प्रेसचा लवकरच शुभारंभ; पंतप्रधान मोदी दाखविणार हिरवा झेंडा

## बडनेरा येथे राहणार थांबा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६नागपूर**

विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्रातील लाखो प्रवाशांकडून प्रतीक्षा केल्या जाणाऱ्या नागपूर (अजनी) पुणे स्लीपर वंदे भारत ट्रेन लवकरच सुरू होणार आहे. पुढच्या काही दिवसांत पंतप्रधान नरेंद्र मोदी बेळगाव-बंगळुरू आणि श्री माता वैष्णोदेवी कटरा-अमृतसरला जोडणाऱ्या दोन वंदे भारत ट्रेनला हिरवा झेंडा दाखविणार असून, या गाड्यांसोबतच अजनी-पुणे वंदे भारत स्लीपर एक्स्प्रेसचादेखील त्याचवेळी शुभारंभ होण्याचे संकेत मिळाले आहेत.




नागपूर-पुणे मार्गावर रेल्वे प्रवाशांची १२ महिने प्रचंड गर्दी असते. त्यामुळे या मार्गावर वंदे भारत एक्स्प्रेस सुरू करावी, अशी दोन वर्षांपासून मागणी आहे. सध्या नागपूर-पुणे मार्गावर सर्वात वेगाने धावणारी गाडी म्हणजे हावडा-दुरांतो एक्स्प्रेस होय. १२ तास, ५५ मिनिटांत ती नागपूरहून पुण्याला पोहचते. वंदे भारत एक्स्प्रेस १२ तासांतच हे अंतर पूर्ण करणार आहे. दरम्यान, ८१० किलोमीटरचा प्रवास बसून करणे त्रासदायक होत असल्याने 'वंदे भारत स्लीपर कोच एक्स्प्रेस' सुरू करावी, अशी मागणी आहे. ही मागणी लवकरच पूर्ण होणार असल्याचे शिर्षस्थ सूत्रांनी सांगितले आहे.

नागपूर-पुणे मार्गावर बाराही महिने प्रवाशांची गर्दी असते. सणासुदीच्या दिवसांत गर्दीत मोठी भर पडते. त्यामुळे खासगी प्रवासी बस आणि विमान कंपन्या मोठ्या प्रमाणात प्रवास भाडे वाढवितात. अशात ऐन सणासुदीच्या दिवसांत वंदे भारत सुरू होणार असल्याचे वृत्त पुढे आल्यामुळे ती प्रवाशांसाठी सणासुदीची मोठी भेट ठरणार आहे.

अजनी-पुणे वंदे भारत एक्स्प्रेस नागपूर-पुण्यादरम्यानचा प्रवास करताना वर्धा, बडनेरा, अकोला, भुसावळ, जळगाव, मनमाड आणि दौंड,अहिल्यानगर, कोपरगाव यांसारख्या प्रमुख स्थानकांवर थांबे घेणार असल्याची सूत्रांची माहिती आहे. त्यामुळे गर्दीच्या शहरांमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी ही गाडी अधिकच सोयीची होणार आहे.

**वंदे भारत धावणार, मात्र...**

नागपूर-पुणे-नागपूर वंदे भारत एक्सप्रेस काही दिवसांतच सुरू होणार असून, त्या संबंधाने रेल्वे मंत्रालयात तयारी झाल्याची शिर्षस्थ सूत्रांची माहिती आहे. या संबंधाने स्थानिक शिर्षस्थ अधिकाऱ्यांकडे संपर्क केला असता त्यांनी गाडी सुरू होणार, मात्र अद्याप अधिकृत 'नोटिफिकेशन' झाले नसल्याचे अर्थात शुभारंभाची तारीख निश्चित झाली नसल्याचे स्पष्ट केले.

# गुन्हेगारी रोखा; अमरावतीच्या सामाजिक शांततेचे रक्षण करा - युवक काँग्रेसची मागणी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

अमरावती शहरात एमडी ड्रग्स, गांजा, चायना चाकूंची विक्री, तसेच अवैध जुगार अड्ड्यांमुळे शहरात गुन्हेगारी मोठ्या प्रमाणात वाढत असून, या परिस्थितीवर तात्काळ व कठोर कारवाई करावी, अशी मागणी युवक काँग्रेसने पोलिस आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

गेल्या काही दिवसांमध्ये शहरातील गुन्हेगारी घटनांमध्ये लक्षणीय वाढ झाली असून, दोन पोलीस कर्मचाऱ्यांच्या हत्येने पोलिस दलाच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सामान्य नागरिकांमध्ये भीती व असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले असून, कायदा व सुव्यवस्था धोक्यात आली आहे, असे युवक काँग्रेसने निवेदनात नमूद केले आहे.

युवक काँग्रेसच्या म्हणण्यानुसार, अमरावती शहरातील अनेक भागांत खुलेआम अमली पदार्थांची विक्री सुरू असून, अल्पवयीन मुलांचे या गुन्ह्यांमध्ये वाढते संख्येने सहभागी होणे ही अतिशय गंभीर बाब आहे. चायना चाकूसारखी धोकादायक हत्यारे सहज उपलब्ध होत आहेत, हे विशेष चिंतेचे कारण आहे.

अमरावती हे शहर 'क्राईम कॅपिटल' बनत असल्याची टीका खुद्द एका आमदाराने विधानसभेत केली आहे. अशा परिस्थितीत पोलिस प्रशासनाचे ठोस व दृढपणे कार्यरत असणे अत्यावश्यक आहे, असे युवक काँग्रेसच्या निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.शहरातील सामाजिक शांतता, कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी कठोर उपाययोजना राबवाव्यात व अवैध धंद्यांविरोधात मोठ्या प्रमाणावर मोहीम हाती घ्यावी, अशी मागणी युवक काँग्रेसच्या वतीने पोलिस आयुक्तांना सादर करण्यात आलेल्या निवेदनात करण्यात आली आहे.यावेळी समीर जवंजाळ,अनिकेत ढेंगरे,सागर कलाने,वैभव देशमुख,आशिष यादव,संकेत साहू,शुभम बांबल ,धनंजय बोबडे,संकेत भेंडे,कृणाल गावंडे,श्रेयस धर्माळे ,कौस्तुभ देशमुख,केदार भेंडे,ओम कुबडे सह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# मेळघाटात एकाच वेळी पाच पट्टेदार वाघांचे थरारक दर्शन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. ६ मेळघाट**

धारणी रोडवरील रोरा गावाजवळ आज सकाळी जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांना प्रवासादरम्यान एकाच वेळी पाच वाघ दिसल्याची धक्कादायक आणि रोमांचक घटना घडली.सध्या पावसाळी हंगाम सुरू असल्याने मेळघाट व्याघ्र प्रकल्पात पर्यटकांची गर्दी वाढली आहे. निसर्ग सौंदर्याबरोबरच आता वास्तविक वाघांचे दर्शन होऊ लागल्यामुळे पर्यटकांमध्ये आनंदाचं वातावरण आहे.जंगलात फिरणाऱ्या वन्यजीवांची संख्या आणि सक्रियता वाढल्याचे वनविभागाच्या निरीक्षणातही आले असून, पर्यटकांनी सावधगिरी आणि नियमांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# आता या लाभार्थ्यांना रेशन धान्य होणार बंद राज्य सरकारने पाठवली यादी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

चारचाकी वाहन असणारे, आयकर भरणाऱ्यांसह वार्षिक उत्पन्न एक लाख रुपयांपेक्षा अधिक असलेल्या रेशनकार्डधारक लाभार्थीची जिल्हा पुरवठा विभागाकडून पडताळणी केली जाणार आहे.



राज्य सरकारकडून रेशन लाभार्थ्यांची पडताळणी करण्याची सूचना पुरवठा विभागाला प्राप्त झाली आहे. गरज नसताना मोफत धान्याचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांची शोधमोहीम सुरू करण्यात आली आहे.

सार्वजनिक वितरण व्यवस्था अंतर्गत अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब योजनेंतर्गत पात्र रेशनकार्डधारक लाभार्थ्यांना दरमहा रेशन दुकानांतून मोफत धान्याचे वितरण करण्यात येते.

त्यामध्ये आयकर भरणारे, चारचाकी वाहन असलेले, जीएसटी क्रमांक असलेले, एक लाख रुपयापेक्षा जास्त वार्षिक उत्पन्न असलेल्या लाभार्थ्यांची यादी प्रशासनाकडून तयार करण्याचे काम सुरू आहे.चारचाकी वाहन असणारे, आयकर भरणाऱ्यांसह वार्षिक उत्पन्न एक लाख रुपयांपेक्षा जास्त असलेल्या रेशनकार्डधारक लाभार्थ्यांना मोफत धान्याच्या लाभासाठी अपात्र ठरविण्यात येणार आहे.या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात आयकर भरणारे, चारचाकी वाहन असलेले, वार्षिक उत्पन्न एक लाख रुपयापेक्षा अधिक असलेले, जीएसटी क्रमांक असलेल्या संबंधित रेशनकार्डधारक लाभार्थ्यांना मोफत मिळत असलेल्या धान्याचा लाभ बंद करण्यात येणार आहे.

### पडताळणीनंतर धान्य होणार बंद

अपात्र ठरणाऱ्या लाभार्थ्यांच्या यादीत जिल्ह्यातील हजारो लाभार्थ्यांचा समावेश आहे. यासंबंधी तक्रारी शासनाकडे होत्या. त्यानुसार तपासणी सुरू आहे. पडताळणी केल्यानंतर संबंधित रेशनकार्डधारक लाभार्थ्यांना धान्याच्या लाभातून बाद ठरविणार असल्याची माहिती पुरवठा अधिकाऱ्यांनी दिली.

### स्वत:हून बाहेर पडावे

जर तुम्ही रेशनकार्डधारक असाल आणि तुमच्या कुटुंबाचे उत्पन्न वाढले असेल किंवा तुम्हाला आता रेशनची गरज नसेल, तर तुम्ही स्वत:हून रेशन योजनेतून बाहेर पडू शकता. यामुळे, गरजू लोकांना योजनेचा लाभ घेता येईल, असे प्रशासनाकडून आवाहन केले आहे.

### पुरवठा इन्स्पेक्टरकडून लाभार्थ्यांची पडताळणी

आयकर भरणारे, चारचाकी वाहन असलेले, वार्षिक उत्पन्न एक लाखापेक्षा जास्त असलेले व जीएसटी क्रमांक असलेल्या लाभार्थी यादीची पडताळणी करून, संबंधित लाभार्थ्यांना दिला जाणारा मोफत धान्याचा लाभ बंद करण्याची कार्यवाही सुरू आहे. तालुकास्तरावर अन्न पुरवठा निरीक्षक लाभार्थ्यांची पडताळणी करणार आहेत.

# रहाटगावातील स्मशानभूमी वाचवण्यासाठी नागरिकांचे आंदोलन; भाजप नेत्यांच्या फोटोंवर दुग्धाभिषेक



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

रहाटगाव येथील शंभर वर्षांपासून अस्तित्वात असलेल्या स्मशानभूमीवरुन निर्माण झालेला वाद चिघळला असून, सर्वधर्मीय नागरिकांनी एकत्र येत जिल्हाधिकारी कार्यालयावर जोरदार आंदोलन केले.

एफ-क्लास शासकीय जमिनीवरील गोविंदप्रभू मंदिराजवळील ही स्मशानभूमी कायमस्वरूपी ठेवावी, अशी नागरिकांची मागणी आहे. सदर स्मशानभूमी हिंदूसह इतर धर्मीयांच्या उपयोगात असून, त्यावरून तटबंदी व शिवमंदिर हटवण्याचे आदेश मिळाल्याचा आरोप करण्यात आला आहे.गावकऱ्यांनी यामागे भ्रष्टाचार असल्याचा आरोप करत, सदर आदेश रद्द करण्यासाठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे निवेदन दिले आहे. आंदोलनादरम्यान, नागरिकांनी गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या फोटोंवर दुग्धाभिषेक करत संताप व्यक्त केला.प्रशासनाने मागण्या मान्य केल्या नाहीत, तर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा आंदोलकांनी दिला आहे.

# राजकारण न्यायव्यवस्थेत शिरले, तर गुन्हेगारीचे राजकारण झाले - यशोमती ठाकूर यांची भाजपवर टीका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

भाजपच्या प्रवक्त्या आरती साठे यांची न्यायाधीशपदी नियुक्ती झाल्यानंतर काँग्रेस नेत्या व माजी मंत्री यशोमती ठाकूर यांनी तीव्र प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी या नेमणुकीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत न्यायव्यवस्थेच्या राजकारणीकरणावर गंभीर टिप्पणी केली.



आज न्यायव्यवस्थेचं पॉलिटिलायझेशन झालं असून, राजकारणाचं गुन्हेगारीकरण झालं आहे. पॉलिटिलायझेशन ऑफ जुडिशियरी आणि क्रिमिनलायझेशन ऑफ पॉलिटिक्स हे आता भारताच्या लोकशाहीचं नवं व्याख्यान झालं आहे, असं ठाकूर म्हणाल्या.त्यांनी इंदिरा गांधी यांचा दाखला देत म्हटलं की, तेव्हा अलाहाबाद उच्च न्यायालयाने पंतप्रधान असलेल्या इंदिरा गांधी यांची निवडणूक रद्द केली होती. म्हणजे न्यायालये स्वतंत्रपणे निर्णय घेत होती. परंतु आजच्या घडीला हे संपूर्णपणे बदलले असून, न्यायव्यवस्थेचा सत्ताधाऱ्यांकडून वापर केला जात आहे. कुठल्याही नैतिकतेला अर्थ उरलेला नाही.यशोमती ठाकूर यांच्या या विधानामुळे राजकीय वर्तुळात पुन्हा एकदा न्यायपालिका आणि राजकारण यांच्यातील सीमारेषांबाबत चर्चा सुरू झाली आहे.

# हिंगोली रेल्वेस्टेशनवरील उभ्या बोगीला आग; संपूर्णतः जळून खाक



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६ हिंगोली**

हिंगोली येथील रेल्वेस्टेशनवरील उभ्या बोगीला आग लागल्याची घटना ६ ऑगस्ट रोजी सकाळी ८:३० वाजेच्या सुमारास घडली. या आगीत एक बोगी संपूर्णतः जळून खाक झाली.

हिंगोली येथील रेल्वेस्टेशनवर मागील काही महिन्यांपासून तीन बोगी उभ्या आहेत. यातील एका बोगीला बुधवारी सकाळी अचानक आग लागली. बोगीतून आगीचे लोट आणि धूर बाहेर निघत असल्याचे रेल्वेस्टेशनवरील अधिकारी - कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आले. कर्मचाऱ्यांनी आगीवर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न केला. परंतु, आग भडकत असल्यामुळे न.प.च्या अग्निशमन दलास माहिती देण्यात आली. त्यानंतर काही मिनिटात अग्निशमन दलाचा एक बंब घटनास्थळी दाखल झाला. परंतु, एका बंबातील पाणी संपले तरी आग आटोक्यात येत नव्हती. त्यामुळे दुसरा बंब मागविण्यात आला. अग्निशमन विभागाच्या सुमारे एक तासाच्या प्रयत्नानंतर आग आटोक्यात आली.

# भंडारज येथील शेतकरी नुकसानभरपाईसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६अमरावती**

अंजनगाव सुर्जी तालुक्यातील भंडारज येथील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांनी आज मोठ्या संख्येने जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक देत नुकसानीच्या भरपाईसाठी जोरदार मागणी केली. ऑगस्ट २०२४ मध्ये झालेल्या सततच्या पावसामुळे संत्रा बागायतदारांचे प्रचंड नुकसान झाले होते. त्यानंतर सरकारकडून मदतीची घोषणा झाली होती. मात्र, अद्यापही बहुतेक शेतकऱ्यांच्या खात्यात नुकसानभरपाई जमा झालेली नाही. या पार्श्वभूमीवर आज शेतकरी न्यायासाठी प्रशासन दरबारी हजर झाले.

# किशोर कुमार यांच्या ९६ व्या जयंतीनिमित्त ९६ तासांच्या वर्ल्ड रेकॉर्ड कार्यक्रमाला अमरावतीत भव्य सुरुवात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

भारतीय संगीतसृष्टीतील अजरामर गायक, अभिनेता आणि हरहुन्नरी कलाकार किशोर कुमार यांच्या ९६ व्या जयंतीनिमित्त अमरावतीत ९६ तासांच्या अखंड संगीत कार्यक्रमाला सोमवारी दुपारी ४ वाजता भव्य शुभारंभ झाला. हा कार्यक्रम श्री छत्रपती बहुउद्देशीय व क्रीडा विकास संस्था व सुरसंगीत कराओके क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला असून, या उपक्रमाने एक नवा वर्ल्ड रेकॉर्ड करण्याचा ध्यास घेतला आहे.



कार्यक्रमाचे उद्घाटन मा. सुलभाताई खोडके, आमदार अमरावती विधानसभा मतदारसंघ, यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. यावेळी मा. डॉ. कमलाताई गवई (लेडी गव्हर्नर), डॉ. गोविंदजी कासट (सामाजिक कार्यकर्ता), माजी प्राचार्य दिलीपसिंहजी खांबरे, तसेच सुनयना खाडे (नागपूर), सतीश अलोणे, अलकाताई वाघमारे, वामन सोमकुवर, सुनील हिरेखन, पुरुषोत्तमजी गावंडे (अध्यक्ष ज्येष्ठ नागरिक मंडळ), प्रशांत डवरे (माजी नगरसेवक), एड. राजेंद्र सायरे, नितीन देशमुख (संचालक, रंगोली पर्ल, अमरावती), गणेश खारकर, दिलीप काळे (माजी प्राचार्य), प्रभुदास फंदे (संचालक, सुरसंगीत क्लब), पवन फंदे (बिल्डर्स अँड डेव्हलपर्स) आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजनाने झाली. त्यानंतर आती रहेगी बहारें... या गाण्याने किशोर दादांच्या स्मृतींना उजाळा देत संगीत मैफलीचा शुभारंभ झाला. सुरसंगीत कराओके क्लबचे संचालक प्रभुदासजी फंदे यांनी के पग घुंघरू... या गाण्याद्वारे रंगतदार सादरीकरण करत वातावरण भारावून टाकले.या उपक्रमात केवळ अमरावती शहरातीलच नव्हे तर इतर जिल्ह्यांतील गायक कलाकारांनीही आपली उपस्थिती नोंदवली आहे. किशोर कुमार यांचा संगीत वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी आणि त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी हा ९६ तासांचा सलग संगीत कार्यक्रम ४ ऑगस्ट रोजी दुपारी ४ वाजता सुरू होऊन ८ ऑगस्ट रोजी त्याच वेळेला समाप्त होईल.

